
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष पंचविसावे / अंक ५ / मे २०२४

## संपादकीय

## गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांचे 'शिक्षण विषयक' विचार

मे महिन्याच्या ७ तारखेला गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी करण्यात आली. ७ मे १८६१ रोजी कलकत्ता येथे एका सधन घरात त्यांचा जन्म झाला. ८० वर्षांच्या यशस्वी आयुष्यानंतर ७ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जयंतीनिमित्त भारतात, तसेच भारताबाहेरील अनेक देशांत कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. गुरूदेव रवींद्रनाथ टागोर हे एक महान विचारवंत होते. त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात अतुलनीय अशी कामगिरी केली. १९१३ चे साहित्याचे 'नोबेल पारितोषिक' देऊन त्यांच्या लेखन कार्याचा गौरव करण्यात आला होता. साहित्याखेरीज संगीत क्षेत्रावर देखील त्यांनी आपली छाप उमटवली. त्यांच्या नावाने ओळखली जाणारी भारतीय संगीताची एक शाखा आहे. तिला 'रवींद्र-संगीत' या नावाने ओळखतात. शिक्षण क्षेत्रात देखील रवींद्रनाथ टागोरांनी भरीव कामगिरी केली आहे. म्हणूनच त्यांना 'गुरूदेव' अशी उपाधी बहाल करण्यात आली आहे. आपल्या शैक्षणिक कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी 'शांति निकेतनची' स्थापना केली. पश्चिम बंगाल राज्यातील बोलपूर गावाजवळ असलेल्या या ठिकाणाला युनेस्कोने मागील वर्षी 'जागतिक वारसा स्थळा'चा दर्जा देऊन गौरव केला आहे. प्रत्येक भारतीय व्यक्तीने या स्थळाला भेट द्यावी असेच ते ठिकाण आहे. त्याचबरोबर गुरूदेव रवींद्रनाथ टागोरांचे शिक्षण विषयक विचार समजून घेऊन, त्यांचा आपल्या शिक्षणात अवलंब करण्याचा प्रयत्न करणे हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे.

गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांचा पहिला शैक्षणिक विचार आपल्या जीवनकार्याशी संबंधित आहे. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, 'हा विचार जीवितध्येय आणि शिक्षणध्येय वेगळे असता कामा नये' असा सांगता येईल. या जगात येणारी प्रत्येक व्यक्ती विशेष कौशल्य घेऊन येते. आपल्याला उपजत प्राप्त झालेल्या कौशल्याचा विचार करून त्या व्यक्तीने आपले जीवनकार्य ठरवायचे असते आणि त्या कौशल्याचा विकास होईल असा शिक्षणाचा मार्ग स्वीकारायचा असतो. गुरूदेवांनी सुचविलेला हा विचार फारच मोलाचा आहे. आपण आपल्या आजूबाजूला पाहतो की, अनेक व्यक्तींना त्यांचे जीवितध्येय काय आहे याचा शोधच लागलेला नसतो! जरी कळले असले तरी समाज

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आणि कुटुंबाच्या दबावाखाली ते शिक्षणाचा वेगळाच मार्ग निवडतात! मानवी शरीराचा अभ्यास करायचा आहे म्हणून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणारे अनेक डॉक्टर पुढे जाऊन आयएएसची परीक्षा उत्तीर्ण होऊन कलेक्टर बनतात हे आपण नेहमीच पाहातो.

'जीवनाला अंतर्बाह्य सुंदर करणे म्हणजे शिक्षण' हा गुरूदेवांचा दुसरा विचार आहे. शिक्षण हे केवळ माहिती जमविण्याचा मार्ग नाही. ते आपल्या 'गुणांना फुलविणाचे महत्त्वाचे साधन' आहे असे गुरूदेवांना सुचवायचे आहे. हे करीत असताना मानवाच्या मानसिक, तसेच आध्यात्मिक विकास या दोन्ही बाबींचा ते विचार करतात. शिक्षणातून एक प्रगल्भ, परोपकारी आणि सामाजिक जाण असलेली व्यक्ती निर्माण व्हावी अशी गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांची अपेक्षा आहे. 'जीवनात जर यथार्थता साधायची असेल तर आम्हाला या शिक्षणाशी सामंजस्य साधता आले पाहिजे' असे आग्रही प्रतिपादन गुरूदेव नेहमी करीत असत.


'शिक्षण ही मानवाला मिळालेली देणगी' आहे असे गुरूदेव सांगत असत. मानवाने भाषा विकसित केली. या भाषेच्या मदतीने आपण जुन्या पिढीने निर्माण केलेले ज्ञान पुढच्या पिढीला देऊ शकतो. हे पवित्र कार्य करण्याची जबाबदारी शिक्षकांवर टाकण्यात आली आहे. ही जबाबदारी चांगल्या तऱ्हेने पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना मुलांविषयी जिव्हाळा असला पाहिजे. शिक्षक/ शिक्षिका हे स्वतः विद्यार्थी बनून ज्ञानार्जन करीत राहिले पाहिजे. असे झाले तरच ते ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे करू शकतील.

'शिक्षण हे केवळ बौद्धिक स्वरूपाचे न राहता त्याला हस्त-व्यवसायाची जोड मिळणे आवश्यक आहे' असे गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांचे स्पष्ट मत होते. शिक्षित व्यक्तीला हाताने काम करताना मुळीच कमीपणा वाटू नये. उलट प्रत्येक शिक्षित व्यक्तीला आपले काम स्वतः करण्यात आनंद वाटला पाहिजे. त्यासाठी सर्व स्तरांवरील अभ्यासक्रमात हस्त-व्यवसायाला पुरेसे महत्त्व दिले गेले पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या शिक्षणसंस्थेत म्हणजे 'शांती निकेतन' मध्ये ते ही बाब कटाक्षाने पाळत असत. तिथे शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले जात असत.

शिक्षणाचे माध्यम काय असावे यावर सतत ऊहापोह होत असतो. या संदर्भात गुरूदेव रवींद्रनाथ टागोरांचे असे स्पष्ट मत होते की, 'शिक्षण हे मातृभाषेतून दिले जावे' ही भाषा मुलांना जवळची वाटते. या भाषेतून शिकविलेल्या संकल्पनांचे मुलांना सहज आकलन होते हे अभ्यासातून देखील स्पष्ट झाले आहे. ब्रिटिश सत्ता भारतात चांगली स्थिरावली होती. त्याकाळात देखील त्यांनी मातृभाषेतूनच शिक्षण देण्याचा आग्रह धरला होता हे विशेष. शिक्षण क्षेत्रातील विचारवंतांनी या बाबीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

जुलै २०२० मध्ये भारतीय संसदेने नवीन शैक्षणिक धोरण मान्य केले. करोना महामारीमुळे ते प्रत्यक्षात आणायला उशीर झाला आहे. शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून या धोरणाची अमलबजावणी करण्यात येणार आहे. त्या धोरणात सुचविलेल्या अनेक बाबी गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या विचारांशी मिळत्याजुळत्या आहेत. त्या निमित्ताने त्यांच्या विचारांचा आपल्या शिक्षणात आपण अवलंब करावा असे मी सुचवू इच्छितो. तीच खरी या महान भारतीय विचारवंताला वाहिलेली श्रद्धांजली ठरेल असे मला वाटते.

**- डॉ. सुधाकर आगरकर**




व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष पंचविसावे/अंक ५/मे २०२४**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक ११ वा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) श्रीरामांचे बुद्धिकौशल्य | डॉ. सच्चिदानंद सुरेश शेवडे | २ |
| ३) ज्ञान व ज्ञान संपादन | डॉ. सतीश देसाई | ७ |
| ४) संगीतायन - नांदी : लेख ३ | डॉ. कीर्ती आगाशे | ९ |
| ५) रॅट होल मायनर्स | दिलीप नारायण वंडलकर | ११ |
| ६) डॉ. आनंद कुलकर्णींच्या 'रोलां बार्थ' पुस्तकाविषयी | डॉ. रोहित कावळे | १४ |
| ७) साहित्यकृती : एक स्फुट चिंतन | डॉ. आनंद कुलकर्णी | १७ |
| ८) स्मरणीय अंदमान | समीर कर्वे | १९ |
| ९) डिजिटल किमानतावाद | अजिंक्य रमेश कुलकर्णी | २३ |
| १०)मनाला भावणारी कसदार कविता..... | प्रा. डॉ. नरेंद्र पाठक | २६ |
| ११)चतुरस्र प्रतिभेचा रसाळ कवी- वैभव जोशी | डॉ. चंद्रहास शास्त्री | २९ |
| १२)परिसर वार्ता | संकलित | ३२ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्रीरामांचे बुद्धिकौशल्य

*ज्येष्ठ अभ्यासक व प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांचा भगवान श्रीरामांच्यावरील लेख - संपादक*

वाल्मिकी रामायणात श्रीरामांच्या बुद्धीची साक्ष पटावी, अशी अनेकानेक उदाहरणे दिसतात. इतकेच नव्हे तर, त्यांच्या चरित्रातून भरपूर शिकवण घेता येते. श्रीरामांचे जे सोळा गुण वाल्मिकींनी वर्णिले आहेत व पुढे जाऊन नारदांनी सत्तरच्या वरती गुण वर्णन केले आहेत; त्यापैकी एकेका गुणासाठी एकेक जन्म अपुरा पडेल! ख्यातकीर्त लोकांकडे यातील एखाद-दुसरा गुण दिसतो. तथापि सर्व गुण सापडणारा अन्य कोणी मिळत नाही. त्यांनी केलेला भरतोपदेश वाचला तरी राज्य कसे चालवावे या बाबती मधील अनेक गोष्टी लक्षात येतात. रामायणात अशा सदुपदेशाच्या अनेक जागा सापडतात. आपण त्यातून किती घेतो, इतकाच प्रश्न आहे!

**भरतोपदेश**

कैकेयीच्या बुद्धिभेदामुळे राज्याभिषेक बारगळतो. श्रीराम, सीता व लक्ष्मण हे वनवासात जातात. दशरथाचे देहावसान होते. भरत अयोध्येत आल्यावर सर्व हकीकत कळल्यामुळे क्षुब्ध होतो आणि राज्य नाकारतो.

श्रीरामांना परत आणण्यासाठी तो चतुरंग सेना, आपल्या माता, श्रेष्ठ व ज्येष्ठ मंडळी यांच्या समवेत वनात जातो. तिथे श्रीरामांचा शोध घेतो व ते भेटताच दुःखावेगाने त्यांना भेटतो. नानाविध प्रश्न विचारून अयोध्येला चलण्याचा आग्रह करतो. त्यावेळी श्रीरामांनी त्याला केलेला उपदेश पाहिला की त्यांचे बुद्धिकौशल्य जाणवते. त्याचप्रमाणे राज्यकर्ता कसा असायला हवा याचे दिग्दर्शन होते.

भरताला श्रीराम 'तात' असे संबोधून विचारतात की,

**कच्चिदात्मसमा:शूरा: श्रुतवन्तो जितेन्द्रिया:।**
**कुलीनाश्चेङ्गितज्ञाश्च कृतास्ते तात मन्त्रिण:।।**
**(अ.,१००-१५)**

(तात, तुझ्याप्रमाणेच शूर, शास्त्रज्ञ, जितेंद्रिय व कुलशील संपन्न व व्यक्तीच्या वागण्या-बोलण्यावरून (बाह्यरूपावरून) त्याचा अंतरंगाची खरी ओळख जाणणाऱ्यांना तू मंत्री बनवले आहेस ना?)

**मन्त्रो विजयमूलं हि राज्ञां भवति राघव ।**
**सुसंवृतो मन्त्रिधुरैरमात्यै: शास्त्रकोविदै:।।**
**(अ.१००-१६)**

(हे राघवा, उत्तम मंत्रीमंडळच राजांच्या विजयाचे मूळ कारण आहे व जेव्हा शास्त्रसंपन्न, नीतिमान मन्त्रिगण या मसलती गुप्त ठेवतात तेव्हाच राज्य सफल होते.)

मंत्री कसे असावेत हे भरताला सुचवताना श्रीराम मंत्र्यांची लक्षणे देखील सांगत आहेत.

पुढे श्रीराम भरतास विचारतात की, 'तू असमयी निद्रा तर घेत नाहीस ना? हे रघुनंदन, तुझी सल्लामसलत दोन किंवा चार कानांपुरतीच मर्यादित राहतेय ना? ती षट्कर्णी होत नाही ना? कारण असे जर झाले तर तुझे गुपीत शत्रुंना कळू शकते.'

(आजही आपण हा शब्द प्रयोग बरेचदा वापरतो की, एखादी गोष्ट 'षट्कर्णी' होता कामा नये. त्याचे मूळ येथे दिसते.)

बरेचदा भारतातल्या राजकारण्यांना व पत्रकारांना

या गोष्टीची जाणीव नसते. ते जाहीरपणे भारतीय लष्कराचे डावपेच, युद्धसज्जता वगैरे जगजाहीर करतात. जेणेकरून त्या आपसूक शत्रूपर्यंत पोचतात.

(आठवा; २६/११ च्या हल्ल्यामध्ये आपले कमांडोज हेलिकॉप्टरमधून उतरत आहेत हे चॅनेल्सवर दाखवल्याने व अतिरेक्यांनी ते हॉटेलमधील टीव्ही चॅनेलवर पाहिल्यामुळे त्या अतिरेक्यांना अगदी पाकिस्तानातून त्याची माहिती दिली जात होती.)

शत्रूला नेहमीच फसवायचे असते, गाफील ठेवायचे असते हे आम्हाला शाळेपासून शिकवायला हवे! या उलट 'शत्रूने एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करा!' हे शिकवले जाते. बरं, रामायणातील काही उदाहरणे मुलांना देऊ केली तर शिक्षणाचे 'भगवेकरण' सुरू झाल्याची ओरड करणे सुरू होते.

राजकारणाशी संबंधीत असे अनेक प्रश्न रामाने भरतास विचारले. यात गंमत अशी आहे की, बारकाईने पाहिले तर या सर्व प्रश्नांत उत्तर देखील सामावलेले आहे.

**कच्चित् सहस्त्रैर्मूर्खाणां एकमिच्छसि पण्डितम्।**
**पण्डितो ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्नि:श्रेयसं महत।।**
**(अ.१००–२२)**

(हे भरता, तू सहस्र मूर्खांच्या ऐवजी एक विद्वान पंडित पदरी ठेवण्याची इच्छा करतोस का?

कारण आर्थिक संकट आल्यास त्यातील विद्वान पंडितच उपयोगास येतो.)

**कच्चित् सहस्त्रैर्मूर्खाणां यद्युपास्ते महीपति:।**
**अथवाप्ययुतान्येव नास्ति तेषु सहायता।।**
**(अ.१००–२३)**

(राजाने हजारो मूर्ख पदरी ठेवले तरी योग्य काळी व वेळी ते उपयोगास येत नाहीत.)

महाभारतात विद्येचे तीन शत्रू कोणते यावर एक सुंदर वचन आहे.

**अशुश्रूषा, त्वरा श्लाघ्या विद्याया:शत्रवस्त्रय:।।**
**(५–४०–४)**

(दुर्लक्ष, त्वरा म्हणजे घाई व स्तुती हे विद्येचे तीन शत्रू आहेत.)

पुढे श्रीराम असे विचारतात की, –

'तू शुर वीर, बुद्धिमान, कुलीन, रणकर्मदक्ष व तुझ्यावर प्रेम असलेल्या व्यक्तीलाच सेनापती नियुक्त केले आहेस ना?

सैनिकांचे योग्य वेतन नियमित देतो आहेस ना?' अन्यथा ते राज्यावर कोपतात व त्यामुळे अनर्थ होऊ शकतो. सैन्य हे पोटावर चालते. त्याची काळजी घेणे हे राजाचे कर्तव्य असते.

असे विविध प्रश्न श्रीरामाने विचारले. विस्तारपूर्वक द्यायचे म्हटले तर जागा कमी पडेल!

या प्रश्नांमागे दुसरा हेतू हा होता की, भरताने राज्य कारभार स्वीकारल्यावर जर जुन्या मंडळींना (मंत्री, सेनापती, अमात्य वगैरे) कमी करून नवीन नियुक्त्या केल्या असतील तर त्या योग्य झाल्यात का? योग्य पदावर योग्य व्यक्तीच नियुक्त झाली की नाही, हे यातून जाणून घ्यायचे होते. केवळ आपला जयघोष करण्याकरता खुषमस्करे नेमले नाहीत ना, याची खात्री करून घ्यायची होती.

श्रीराम हे अष्टावधानी होते. धर्म, वेद शास्त्र, अर्थ, सैन्य, शस्त्रास्त्र या सर्वच बाबतीत त्यांचे ज्ञान अगाध होते. राजा कसा असावा याचे एकमेव अद्वितीय असे उदाहरण श्रीराम होते, म्हणूनच रामराज्य हे आजही लोकांच्या स्मरणात आहे.

---

सत्याला शपथांच्या टेकूची गरज नसते!

असेच प्रश्न महाभारतात नारदांनी युधिष्ठिरास विचारले आहेत. 'कच्चित् प्रश्न' या नावाने ते प्रसिद्ध आहेत.

रामाने भरतास असे क्षेमकुशल प्रश्न विचारून भरताचा एक प्रकारे राजनीतीचा अभ्यास घेतला होता.

जाबालिद्वारा-नास्तिकमत उपदेश

भरताने रामांची समजूत घालून अयोध्येत आणण्याकरता प्रयत्न केला; परंतु राम हे वचनपालन तत्पर व सत्यप्रिय असल्याने त्यांनी भरताचा आग्रह मानला नाही. त्यावेळी मातांनी देखील रामांची समजूत घातली; परंतु राम दृढनिश्चयावर ठाम होते. राम- लक्ष्मण- सीता हे अरण्यात राहतात, कंदमुळे भक्षण करतात व वल्कले नेसतात, हे पाहून सर्वजण दु:खी झाले.

त्यावेळी श्रीरामांची समजूत घालण्याकरता जाबाली नामक नास्तिक मत मानणारा एक ब्राह्मण समोर आला व त्याने रामांना उपदेश केला. ''या संसारात कोण कोणाचा बंधू आहे? जीव एकटाच येतो आणि एकटाच नष्ट होतो. जो माता-पित्यांच्या विषयी आसक्त राहतो तो वेडा समजला पाहिजे. कोणी कोणाचे नसते.

एखादा माणूस प्रवासात जाताना वाटेत एखाद्या धर्मशाळेत विश्राम करतो, रात्री मुक्काम करतो व सकाळी उठून ती जागा सोडून निघून जातो. त्याचप्रमाणे माता, पिता, धन, गृह हे आवास (एका रात्री पुरते मर्यादित) आहे. त्यावर सज्जन पुरुष आसक्त होत नाहीत.

हे रघुनंदन, वडिलांचे एवढे साम्राज्य सोडून तू या काटाकुट्यात, वनात, कुत्सित मार्गावर का चालतो आहेस?

राजकुमार रामा, अयोध्या नगरी तुमची एकवेणी घातलेल्या नारीप्रमाणे वाट पाहतेय. तुम्ही राज्योपभोग घ्या. अयोध्येत विहार करा.

राजा दशरथ हा तुमचा कोणीच नव्हता. तो निमित्त होता. ऋतुमती मातेच्या द्वारे वीर्य व रज यांचा संयोग झाल्यावर पुत्र जन्म होतो. राजा दशरथाला जिथे जायचे होते तेथे तो गेला (निधन झाले), आता तू का त्याच्याकरता दु:ख कष्ट भोगतोस? यज्ञ, दान, धर्म, आचरण हे सगळे असत्य आहे. तू प्रत्यक्ष दिसणाऱ्या राज्याच्या उपभोग घे. पारलौकिक लाभाच्या मागे न लागता या राज्यात राहून सगळे उपभोग घे. तू भरताचे ऐक. वचन पालन करून सत्यमार्ग अनुसरून पुण्य मिळते, वगैरे गोष्टी बाजूला सार व राज्य उपभोग.

भरताचे मत तू मान्य कर आणि राज्याचा उपभोग घे.''

हे वाचल्यावर क्षणभर आपणास असे वाटते की, जाबाली योग्य बोलत आहे. या जगात कोणी कोणाचे नसते. दशरथ राजाचे निधन झाले, त्याच सोबत त्याला दिलेले वचन पण संपले.

पण यातच खरी गोम आहे. नास्तिकवाद्यांचे दाखवायचे दात वेगळे असतात व खाण्याचे दात वेगळे असतात! हे विचार द्वंद्व सदैव आपल्या मनात सुरू असते.

एक उदाहरण देतो.

एखाद्या पंतप्रधानाने जनतेला दिलेले एखादे वचन पूर्ण केले नाही वा राहून गेले, तर त्याच्यावर वचनभंगाचा आरोप ठेवत सर्वजण टीका करतात. यात नास्तिकवादी अग्रेसर असतात.

वचनभंग करणारा राजा हा उत्तम प्रजापालक, प्रजाहितदक्ष असू शकतो का? याचे उत्तर 'हो' असेल तर मग प्रत्येक वेळी पवित्र कुराणाची शपथ घेऊन, 'मी आता पृथ्विराज चौहानवर आक्रमण करणार नाही', असे खोटे बोलून, आक्रमण करून पुन्हा प्रत्येक वेळी

खोटे वचन देणारा आणि आक्रमण करणारा महंमद घौरी हा आपला आदर्श मानावा लागेल! (१७ वेळा हा वचनभंग घौरीने केलाय!)

'आम्ही व्यापाराकरता आलोय, आम्हाला राजकारणात पडायचे नाही', असे म्हणून गोड बोलून खोटे वचन देणारे आणि हिंदुस्थानला गुलाम बनवणारे ब्रिटिश आदर्श मानावे लागतील!

आपल्या संस्कृतीत रामराज्य हेच आदर्श मानले गेले आहे, कारण रघुपासून श्रीरामांपर्यंत सर्व राजांनी वचनबद्ध राहून, सत्यप्रिय धर्मपरायण राहून उपभोगाकरता राज्य नसून प्रजेचे पुत्रवत् पालन हे कर्तव्य मानून राजधर्म सांभाळला आहे.

महाभारतात एक सुंदर वचन आले आहे.

**लोकरञ्जन मेवात्र राज्ञां धर्म:सनातन:।।१२- ५७- ११**

(या लोकी प्रजेला सुखी ठेवणे हाच राजाचा सनातन धर्म आहे.)

संपत्ती उपभोग हा राजाचा धर्म नाही. जाबाली नेमके तेच करायला सांगतोय. जाबाली रामाला राज्य उपभोग सांगतो आहे, यात खरी गोम आहे.

एखाद्या मंत्र्याने पाप-पुण्य न मानता प्रजेचा पैसा स्वत:च्या स्वार्थाकरता वापरला की आपण त्याच्यावर कडक शब्दात टीका करतो. एखाद्याने पाप-पुण्य संकल्पना मानून बंगले, गाडी, प्रॉपर्टी केली नाही व पैसे खाल्ले नाहीत तरी आपण म्हणतो की, काय उपयोग? एवढी वर्षे सत्तेत राहून चार पैसे पण शिल्लक ठेवले नाहीत!

समाजात टीका उभय बाजूने होते.

रामाच्या समोर हे वैचारिक द्वंद्व उभे राहिले. पण रामाने मनोनिग्रहाने त्याचे खंडन केले.

आणखी एक गंमत सांगतो. एका प्रसिद्ध नास्तिक अंधश्रद्धा निर्मूलकाच्या अंत्ययात्रेत '.....अमर रहे' ची घोषणा त्यांचे अनुयायी जोरजोरात देत होते. 'आत्मा अमर असतो', या उपनिषद प्रतिपाद्य व भगवद्गीतोक्त संकल्पनेची त्यांनी अनेकदा खिल्ली उडवली होती. त्यामुळे माझी स्वत: द्विधा अवस्था झाली. जे गेले ते एक सांगत असत व त्यांचे अनुयायी मात्र भलत्याच घोषणा देतात, मग यात नेमके खरे कोणाचे? 'आत्मा वगैरे बकवास आहे. आत्मा नसतो' हे त्या गेलेल्या मुख्य माणसाचे मत मानावे? की अनुयायांचे 'आत्मा अमर असतो' हे मत मानावे? कारण ते अनुयायी जोरदार घोषणा अमर रहे 'अमर रहे' अशा देत होते.

**श्रीरामद्वारा नास्तिकमतखंडन**

अनेकांच्या मनात एक शंका आहे की, कौसल्येपासून, भरतापर्यंत सर्व कुटुंबीय, सर्व पुरोहित, प्रजाजन, मंत्रीगण हे जर रामांना राज्य स्वीकारण्यास सांगत आहेत, ते तर सर्वजणही नास्तिकच मानावेत का? याचे उत्तर फार सोपे आहे. अन्य मंडळी 'राज्यारोहण' हा रामांचा हक्क आहे व ते या पदाकरता सर्वार्थाने योग्य आहेत, यासाठी आग्रह धरतात. 'दशरथांच्या पश्चात तुझे पुत्रकर्तव्य कर', या हेतूने रामांना समजावत आहेत. या उलट जाबाली हा, माता-पिता हे कोणी कोणाचे नसतात. तू राज्य हे स्त्रीप्रमाणे उपभोग, पाप-पुण्य हा विचार करू नकोस' असा विचित्र उपदेश जाणीवपूर्वक करतोय.

रामांना 'राज्यात परत या', हे सांगण्याची कृती एकच असली तरी त्यातील हेतू भिन्न आहे.

आपल्या धर्मात पाप अथवा पुण्य ही संकल्पना कृतीवर अवलंबून नसून, हेतूवर अवलंबून आहे.

आता जाबालीचे मत राम कसे खोडतात ते पाहू. ते म्हणतात,-

**भवान् मे प्रियकामार्थं वचनं यदि होक्तवान् ।**
**अकार्यं कार्यसंकांश मपथ्यं पथ्य संनिभम् ।।**
**(अ.१०९.२)**

(विप्रवर, तुम्ही जी माझ्या कल्याणाची गोष्ट सांगत आहात, ती एखाद्याला कर्तव्य भासेल, ती दिसायला पथ्यकारक दिसेल; पण ती वास्तवात अपथ्यच असेल.)

तुम्ही सांगितलेल्या मार्गावर मी चाललो तर मी स्वेच्छाचारी होईन व जसे राजाचे आचरण असेल तशीच प्रजा वागेल (अशामुळे राज्यात अराजक माजेल, राजाला व प्रजेला न्याय व नैतिकता यांचा धाक हवा.)

**सत्यमेवानृशंसं च राजवृत्तं सनातनम् ।**
**तस्मात् सत्यात्मकं राज्यं सत्ये लोक:प्रतिष्ठित:।।**
**(अ.१०९-१०)**

(सत्याचे पालन हा राजाचा प्रधान धर्म आहे व हाच सनातन आचार आहे. राजा हा सत्य स्वरूपच हवा, कारण सर्व जग हे सत्यातच प्रतिष्ठित आहे.)

ऋषिमुनी, देवता या सर्वांनी सत्याचा आदर केलाय.

वेद, यज्ञ, दान, होम या सर्वांचा मूळ आधार सत्य आहे; मग मी सत्य कसे त्यागू? मी सत्यपालनाची प्रतिज्ञा केली असल्याने आता राज्यलोभ, द्रव्याचा मोह व विवेकशून्य होऊन ती प्रतिज्ञा मोडणार नाही.

**कायेन कुरुते पापं मनसा सम्प्रधार्य तत् ।**
**अनृतं जिव्हया चाह त्रिविधं कर्म पातकम् ।।**
**(अ.१०९-२१)**

(मनुष्य जे पाप आपल्या शरीराद्वारे करतो, ते सर्व प्रथम मनाने निश्चित करतो; मग जिभेच्या सहाय्याने ते अनृत कर्म दुसऱ्यांना सांगतो व अन्यांच्या सहकार्याने ते शरीराद्वारे संपन्न करतो. त्यामुळे हे कायिक, वाचिक व मानसिक अशा तीन भेदांनी पापकर्म होते.)

जाबाली, तुम्ही जो मला उपदेश करत आहात तो वरवर श्रेष्ठ वाटतोय; पण तो अयोग्य आहे. कारण राजा हा सत्यप्रिय, वचनप्रिय व धर्माचरणी हवा. तुम्ही या सर्वांचा त्याग करून मला, 'राज्य स्वीकार', असे सांगत आहात.

राम या नंतर प्रचंड क्रोधायमान झाले व त्यांनी जाबालीला सांगितले की,-

'सत्य, धर्म, पराक्रम, सर्व प्राणिमात्रांवर दया, सर्वांशी प्रिय बोलणारा, देवता, अतिथी व आचारसंपन्न वेदशास्त्र निपुण ब्राह्मण यांची सेवा करणे हा स्वर्गलोकाचा मार्ग साधू पुरुषांनी सांगितला आहे.'

(तोच जाबाली त्याग करण्यास सांगत आहेत)

राम या नंतर म्हणतात, 'माझ्या पित्याने तुम्हाला आपल्या पदरी ठेवले, हे त्यांचे वर्तन अयोग्य होते व त्याबद्दल मी नापसंती व्यक्त करतो. जी व्यक्ती राजाला धर्म, न्याय, सत्य व नीतिमत्ता यांचा त्याग करून केवळ उपभोगाकरता राज्य असते असे सांगतो, अशा पाखंडी व्यक्तीचा वध करणे हेच शास्त्रसंमत आहे.'

तेव्हा जाबालीने थोडे नरमाईचे धोरण स्वीकारले व रामाला म्हटले, 'मी आता तुझ्या समजावण्याने काही काळ आस्तिक बनलो आहे; पण नंतर पुन्हा नास्तिक होऊ शकतो.!'

आरंभी बालकांडातील व नंतरची अयोध्याकांडातील उदाहरणे ही केवळ वाल्मिकी रामायणातील दिली आहेत. एवढ्यावरून विषयव्याप्ती लक्षात यावी. श्रीरामांना या त्यांच्या गुणांमुळेच भारतीय संस्कृती ही 'आदर्श नायक' मानते. विस्तारभयास्तव येथेच विराम घेतो.

**- डॉ. सच्चिदानंद सुरेश शेवडे**
डोंबिवली

●●●

स्तुतीने चांगली माणसे सुधारतात, तर वाईट माणसे बिघडतात!

# ज्ञान व ज्ञान संपादन

*कोणत्याही विषयाचे ज्ञान प्राप्त करताना मूलत: त्या मागील उत्सुकता मनामध्ये निर्माण झाली पाहिजे हे महत्त्वाचे. या संदर्भातील चौकसपणा बाबतचा हा लेख - संपादक*

अनेक अनुभव व समजुती अशा आहेत की, काहीतरी माहिती तोंडपाठ करून परीक्षेत यश मिळवले की ज्ञानप्राप्ती झाली! एकाद्या विषयाचा मन:पूर्वक अभ्यास करून व त्या विषयाला आत्मसात करून जे प्राप्त होते ते 'शुद्ध ज्ञान' (knowledge). असे ज्ञान हे अंतर्मन प्रकाशित करणाऱ्या बुद्धीचे स्वरूप आहे. बुद्धीमन व्यक्तींच्या अंत:करणात अंधार नसतो आणि अशा व्यक्तींच्या विचारांना व कार्यशीलतेला मुक्ती मिळालेली असते.

सामान्य जीवनासाठी लागणारे ज्ञान केवळ माहितीच असे म्हणावे लागेल. पूर्वजांच्या अनुभवाने नोंद करून ठेवलेली माहिती व स्वत:चे काही अनुभव यांच्या उपयोगाने मर्यादित प्रसंगी वेळ निभावणे शक्य होते. परंतु नोंद करून ठेवलेली पुस्तकी माहिती जुन्या काळातील प्रश्नांसाठीच योग्य असते. तिचा उपयोग करून वर्तमान काळातील नव्या वातावरणात निर्माण झालेल्या प्रश्नांसाठी उत्तरे शोधणे सर्वथा यशस्वी होऊ शकत नाही. यासाठी शुद्ध ज्ञान व बुद्धी वापरून प्रकाशित केलेल्या मनाने मार्ग शोधावा लागतो.

एकाद्या विषयाचा सखोल, मन:पूर्वक व भक्तीभावाने (devotional) केलेला अभ्यास व तत्त्वज्ञाचे (philosopher) चिंतन व मनन करून सत्य शोधण्याचे प्रयत्न यात साम्य दिसून येते. जागृतावस्थेत केलेल्या सखोल अभ्यासामुळे अचानक योग्य क्षणी समस्या सुटू शकतात - स्वप्नात देखील! अठराव्या शतकातील एक इंग्लिश कवी कोलरीज (वर्डस्वर्थचा समकालीन) स्वत: एक तत्त्वज्ञही होता. त्याच्या मते थोर कवी हे प्रगल्फ तत्त्वज्ञच असतात. त्याने भाषेचा सखोल अभ्यास केला होता. त्या अनुषंगाने त्याला त्याची प्रसिद्ध कविता "The Rime of the Ancient Mariner" स्वप्नात सुचली होती. यात योगायोगाचा अवलेश नव्हता! अशी इतर अनेक उदाहरणे आहेत. शास्त्रज्ञ व गणित तज्ज्ञ न्यूटनला सफरचंद झाडावरून जमिनीवर पडले हे पाहून गुरुत्वाकर्षणाची जाणीव झाली. विचारवंत आर्कीमेडिसला बाथटबमधील पाणी ओसंडलेले पाहून बॉयंसिच्या नियमाचा शोध लागला होता. शिलाई मशिनसाठी लागणाऱ्या योग्य सुईची समस्या इल्रीयास होव या अठराव्या शतकातील अमेरिकन संशोधकाने त्याच्या स्वप्नात मिळालेल्या सूचनेनुसार सोडविली होती. त्याच्या स्वप्नात नरभक्षक त्याचा पाठलाग करत होते व त्यांच्या भाल्यांच्या टोकांना छिद्रे होती. जाग आल्यावर त्याच्या लक्षात आले की, सुईला कार्यक्षमतेने धागा घालण्यासाठी टोकातही छिद्र असणे आवश्यक आहे.

सखोल, मन:पूर्वक व भक्तीभावाने (devotional) केलेला अभ्यास शोधकालरा केवळ पुस्तकी माहितीचा वापर करून मिळवलेल्या ज्ञानाच्या पलीकडे घेऊन जातो. अर्थात् थोर प्रतिभावंत लेखकांचे ग्रंथ उपयुक्त मार्गदर्शन करतात यात शंका नाही. पण त्यांतून योग्य आदेश मिळवण्यासाठी व निष्कर्ष काढण्यासाठी बुद्धिचे सहाय्य आवश्यक असते. उदाहरणार्थ, शेक्सपीयरच्या साहित्याचा सखोल अभ्यास करून अनुक्रमाने अन्वेषण, विवेचन, माहिती आणि कल्पनाशक्ती (investigation,

interpretation, information and imagination) या गुणांना उत्तेजन मिळते. कल्पनाशक्ती व अंत:प्रेरणा (intuition) यांच्या अनुपस्थितीत जगात कुठल्याही बाबतीत प्रगती होणे अशक्यच होते. ऐतिहासिक दृष्ट्या प्रगतीचा मार्ग आखण्यात प्रथम धर्मशास्त्र, नंतर तत्त्वज्ञान आणि शेवटी विज्ञान असा पदानुक्रम (hierarchy) मानला जातो. यात उद्भवलेले अनेक पूर्वकालीन प्रश्न महान ज्ञानी संतांनी तपस्या करून मिळवलेल्या अंत:प्रेरणेच्या मार्गाने सोडवलेले आहेत. अशा व्यक्ती जन्मल्या नसत्या तर रूढ मार्गाने जाणाऱ्या प्रतिगामी व अत्याचारी मानवांचे सदाकाळ वर्चस्व राहिले असते, तुंबलेल्या तळ्याप्रमाणे!

आपल्या विषयाला समर्पित (dedicated) अशा सत्यशोधकांचे प्रयास आणि संगीत व क्रीडा क्षेत्रातील लोकप्रिय व्यक्तींचे प्रयास व जास्तीत जास्त उत्कृष्टतेसाठी त्यांनी केलेला अट्टाहास यांत साम्य दिसून येते. कुमार गंधर्व गाताना अचूक सम घेत असत वा अनपेक्षित अशी तान पेश करीत असत. या मागे कुमारांचे समर्पित श्रम होते, ज्यामुळे श्रोत्यांकडून उत्स्फूर्त वाहवा मिळत असे. सचिन तेंडुलकरचा कव्हर ड्राइव्ह प्रेक्षकांना आश्चर्यचकित करत असे. पण अशा शैल्लीपूर्वक बल्लेबाजीमागे शिस्तबद्ध जीवन, मानसिक बळ व समर्पित प्रयास समाविष्ट असतात.

१३ व्या शतकातील भगवद्गीतेचे उपासक व वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिणारे संत ज्ञानेश्वर २१ व्या वर्षी संजीवन समाधी घेऊन स्वर्गवासी झाले. या मागे अलौकिक तपस्येच्या मार्गे संपादन केलेली उच्च जागृती आणि शुद्ध ऊर्जा होती. प्राचीन भारतातील अष्टांग योगानुसार त्यांनी खोल ध्यानावस्थेत प्रवेश करून स्वेच्छेने नश्वर शरीर सोडले होते. गिरनारचे (गुजरात प्रांत) स्वर्गवासी महर्षी बापूश्री पुनीताचारी यांनी १३ वर्षे पर्वतावरच्या गुहेत तपस्या केली होती. भगवान दत्तगुरूंच्या कृपेने ते जनतेसाठी मंत्रजप व मानसिक स्वस्थतेसाठी सुयोग्य मार्ग उपलब्ध करण्यासाठी कार्यरत झाले होते. अष्टांग योगानुसार खोल ध्यानावस्थेत प्रवेश करणे सर्वांना शक्य नाही हे बापूश्री पुनीताचारी यांना कळले होते. चिंतनमार्गे मनातले विचार व ईर्षा संपूर्णतया काढून टाकणे सर्व जनांना अशक्य किंवा मर्यादेपलीकडचे आहे. यासाठी त्यांनी 'सहज योग' प्रचारित केला, ज्यानुसार भाविक रोज १५-२० मिनिटे चिंतन, १५-२० मिनिटे प्राणायाम (शक्य होईल त्याप्रमाणे) व १५-२० मिनिटे मंत्र (हरी ॐ तत्सत् जय गुरुदत्त) जप करतात. मी स्वानुभवानुसार सांगू शकतो की, या योगे मन:स्वास्थ्य प्राप्त होते. अतिशय सखोल अभ्यास जमत नसेल वा समर्पित ध्यानावस्था अशक्य असेल तर विचारशील व्यक्तीसाठी 'सहज योग' हा मधला मार्ग नीतिमान जीवनाला आवश्यक अशा ज्ञानप्राप्तीसाठी योग्य आहे.

बापूश्री व झुरिचचे (स्वित्झर्लंडवासी) ओंकारनंद स्वामी यांच्या मते सुयोग्य ज्ञानप्राप्तीसाठी सद्गुरू मिळणे अत्यंत आवश्यक आहे. दतसंप्रदायातील 'अवधूत गीता' व 'गुरू गीता' या भगवदगीतेशी सुसंगत अशा ग्रंथांत गुरूच्या मार्गदर्शनाची महती वर्णन करण्यात आली आहे. ओंकारनंद स्वामी यांचे मत असे की, गुरू मानवजातीला सत्याच्या दिशेने नेऊ शकतात आणि ते शिष्याच्या अस्तित्वाचे परिवर्तन ईश्वर-अनुभवाच्या मार्गाने स्थिर व चारित्र्यशील बनवतात.

सद्गुरूची तुलना परमात्म्याच्या स्वरूपांशी (ब्रह्मा, विष्णू व महेश) केली जाते. (गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः। गुरुर्साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः।।) दत्तसंप्रदायी मानतात की, सभोवताली निसर्गात अनेक गुरूतुल्य घटकांचे वास्तव्य आहे. स्वत: श्रीदत्ताचे

(पृष्ठ क्र.२८ वर)

# संगीतायन
# नांदी : लेख ३

*'संगीतायन' या लेखमालेतून आपण संगीत या विषयाशी जोडल्या गेलेल्या अनेक घटना, संगीत प्रकार, कलाकारांचे किस्से अशा अनेक गोष्टींचा आस्वाद घेणारा संवाद साधणार आहोत.*

*नांदी म्हणजे नाटकाच्या सुरुवातीला म्हटलेला इष्ट देवतांच्या नमनाचा किंवा प्रार्थनेचा श्लोक. म्हणजे एकाप्रकारे ईशस्तवनच. १८४३ सालच्या 'सीता स्वयंवर' या पहिल्या संगीत नाटकापासून सौभद्र, स्वयंवर, शाकुंतल, मानापमान, संन्यस्त खड्ग, मूकनायक, जय जय गौरीशंकर, कट्यार काळजात घुसली, बावनखणी अशा अनेक संगीत नाटकांमध्ये विविध राग, ताल यामध्ये नांदी साकार झाली. अण्णासाहेब किर्लोस्कर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, वि. दा. सावरकर, विद्याधर गोखले, वसंत कानेटकर, पुरुषोत्तम दारव्हेकर अशा अनेक दिग्गज नाटककारांनी मराठी संगीतभूमीला चिरतरुण ठेवलं. 'नांदी' या अभिजात संगीत कलाकृती बद्दलचा हा तिसरा आणि अंतिम लेख. ३१ ऑक्टोबर १८८० रोजी पुण्यात 'संगीत शाकुंतल'च्या पहिल्या प्रयोगातील 'पंचतुंड नर रुंडमालधर' नांदीची रम्य कहाणी, नांदीसाठी योजलेले राग, ताल, नांदीचा सामाजिक आणि राजकीय आशय लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी केलेले प्रयत्न, नांदीचे नित्य नूतन बदलते रूप आणि ते सादर करण्यासाठी केलेले अभिनव प्रयोग याचा रंजक आढावा आपल्यापर्यंत पोहचविण्यासाठी केलेला हा लेख प्रपंच. – संपादक*

नांदी ही नाटकाच्या सुरवातीस गायली जात असल्यामुळे त्यासाठी काही विशिष्ट तालांची आणि रागांची योजना केलेली दिसते. भूप, यमन, केदार, हमीर, बिलावल, शंकरा अशा भारदस्त पारंपरिक रागांबरोबरच हिंडोल, खमाज, झिंजोटी, दुर्गा, भटियार तर क्वचित प्रसंगी दरबारी सारखा गंभीर राग देखील आढळतो. यातील 'हमीर' हा राग नाटककार आणि संगीतकारांचा विशेष आवडीचा दिसतो. या 'हमीर' रागातच चार लोकप्रिय नांदी आहेत. १८९९ साली 'जरठ कुमारी विवाह' या त्याकाळच्या प्रथेवर प्रहार करणारं 'शारदा' नाटक देवलांनी लिहिलं. या नाटकातील नांदी पारंपरिक धृपदा सारखी बांधली आहे. हमीर रागातील 'शंकरपद वंदू आधी' या नांदी नंतर लगेच बहार रागातील 'सौख्य पूर्ण देवो तुम्हा श्री गिरीजेचा कान्त तो' ही जोड-नांदी गायली जाते.




'संगीत मानापमान' नाटक म्हणजे संगीत रंगभूमीवरील खऱ्या अर्थाचे मानाचे पानच! या नाटकातील काकासाहेब खाडिलकरांनी रचलेल्या 'नमन नटवरा विस्मयकारा' या हमीर रागातील नांदीने अमाप लोकप्रियता मिळवली. याच नाटकात 'केदार' रागामधील मधील 'मोद हराया प्रेम वाढवू' ही जोडनांदी देखील रचली गेली.

पठडीतल्या पारंपरिक संगीत नाट्यभूमीला आपल्या प्रतिभेचा अलौकिक स्पर्श देऊन नवसंजीवनी दिली पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी ! अभिजात संगीता बरोबरच संगीत नाटकात त्यांनी अनेक नावीन्यपूर्ण बदल आणि प्रयोग सातत्याने केले. पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'कट्यार काळजात घुसली' मधील 'हे जगदीश सदाशिव शंकर' या नांदीसाठी अभिषेक यांनी 'हमीर' राग निवडला. म्हणजे १८९९ मधील 'संगीत शारदा' पासून ते १९६७ सालच्या संगीत कट्यार काळजात घुसली' पर्यंत ही हमीर रागाची मोहिनी कायम राहिली. पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी याच नाटकात 'हे जगदीश सदाशिव शंकर' या नांदीसाठी नऊ मात्रांचा मत्तताल निवडला. हा पण एक वेगळाच प्रयोग होता. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या लेखणीतून साकारलेल्या 'ययाती देवयानी' या नाटकासाठी चौताल या तालात पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी 'शंकर हर त्रिपुर हनन' ही नांदी स्वरबद्ध केली होती. अभिषेकींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अनेक अनवट राग नाट्यसंगीताच्या माध्यमातून रंगभूमीवर आणले. 'संगीत मत्स्यगंधा' या नाटकात शंतनू, सत्यवती आणि पराशर या महाभारतातील पात्रांभोवती फिरणारा १५० वर्षांचा काळ प्रा. वसंत कानेटकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झाला. या नाटकाची नांदी अभिषेकी बुवांनी 'देवसाग' या अनवट रागात आणि झपताल तालात बांधली. या नांदीचा मुखडा आजही वादनासाठी लेहरा म्हणून वाजविला जातो.

नांदीसाठी सर्वसाधारण त्रिताल, धुमाळी, झपताल, एकताल, केरवा हे ताल वापरले जायचे. पण १९२८ साली कोल्हटकरांनी 'वधूपरीक्षा' या नाटकातील 'त्या हे, नमन करी हरीला' या बिहाग रागातील नांदीसाठी, भावगीत, गझलसाठी वापरला जाणारा 'रूपक' हा ताल वापरला. पडद्याआडून नांदी म्हणायची, या प्रथेला बाजूला ठेवून १९०१ साली श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी 'मूकनायक' नाटकात 'हे प्रभो विभो अगाध किती तव करणी' ही नांदी एका वेगळ्या स्वरूपात रंगभूमीवर आणली. म्हणजे पडदा उघडताच चक्क झोपाळ्यावर बसून मंगळागौर पूजणाऱ्या स्त्रिया पारंपरिक गीताप्रमाणे ही नांदी गाताना दिसतात. रसिकांना हा आल्हाददायी सुरेल धक्का बसतो. खाडिलकरांनी 'संगीत विद्याहरण' नाटकातून अशीच एक वेगळी नांदी रंगभूमीवर आणली. यातील प्रसंग असा आहे की, देवयानी, शर्मिष्ठा आणि त्यांच्या सख्या दालनात बसल्या आहेत आणि देवयानी वीणावादन करताना 'सुखकर हे होवो मज' ही तराणा या संगीत प्रकारावर आधारित नांदी म्हणते.

नांदीची लोकप्रियता रुपेरी पडद्यापर्यंत देखील पोहोचली. शंकर जयकिशनच्या 'कठपुतली' चित्रपटातील वैजयन्तीमालाचं 'बागड बम बम' नृत्यगीत आठवतं? हे गीत रचलं होतं १९१३ सालच्या 'संगीत महानंदा' या वासुदेव नीलकंठ आगटे यांच्या नाटकातील नांदी वरून! चित्रपट सृष्टीमध्ये लोकप्रियता आणि सन्मान मिळालेले वसंत देसाई यांनी 'होनाजी बाळा' ची शाहिरी ढंगातील 'वक्रतुंड गजानन पावला' ही नांदी स्वरबद्ध केली. त्यांच्या 'सप्तसूर झंकारीत बोले' आणि 'विश्व नाट्य सूत्रधार' या नांदी सादर करायला पंडित राम मराठे यांच्या सारखा कसलेला कलाकारच लागतो. त्यामुळे आजही बऱ्याचवेळा या नांदीचं रेकॉर्डिंग वाजवूनच काम भागवलं जातं. त्या तुलनेत राम गणेश गडकरी यांच्या 'संगीत पुण्यप्रभाव' नाटकातील 'प्रभू पदास नमित दास' ही नांदी तिच्या सोप्या चालीमुळे आजही सहज गायली जाते. गडकरी यांच्या सर्व नाटकांच्या आधी हीच नांदी गायचा प्रघात आहे.

आज नांदी तिच्या पूर्णतः मूळ स्वरूपात राहिली नाही. काही वेगळ्या रूपात तिचं अस्तित्व आहे. नाटकाचा पडदा उघडायच्या आधी नटराज पूजन होतं.

(पृष्ठ क्र. ३१ वर)

# रॅट होल मायनर्स

*उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील सिलक्यारा गावी झालेल्या दुर्घटनेत बोगद्यात अडकलेल्या श्रमिकांना सुखरूप बाहेर काढण्यास मदत करणाऱ्या 'रॅट होल मायनर्स' ची शौर्यगाथा प्रस्तुत लेखात सादर करण्यात आली आहे.- संपादक*

दि.१२ नोव्हेंबर २०२३. दिवस होता दिवाळीचा, लक्ष्मीपुजनाचा. भारतभर आनंदात साजरा होत असतानाच, उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील सिलक्यारा गावी काहीतरी वेगळेच वाढून ठेवले होते. हिमालयातील यमुनोत्रीपर्यंतचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी बी. आर. ओ. (बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन) तर्फे सुमारे ५ कि.मी. लांबीचा बोगदा तयार करण्याचे काम वेगात सुरू होते. काम जोखमीचे असले तरी भविष्यात होणाऱ्या उपयुक्ततेमुळे ते जरुरीचेसुद्धा होते. हे अभियान अशाप्रकारे नेटाने सुरू असतानाच दगडधोंड्यांचा, चिखलमातीचा खच बोगद्यात वरून खाली एकाएकी कोसळला. आतमध्ये कार्यरत असणारे ४१ कामगार अंधारात अडकून पडले. उर्वरित जगाशी संपर्क तुटला. झालेली दुर्घटना लागलीच वरिष्ठांना कळविण्यात आली. त्यांनी ताबडतोब कामगारांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय व प्रादेशिक सरकारी यंत्रणा त्वरेने कामास लागल्या. NDRF, SDRF, BRO, BSF, खाजगी व सरकारी कंपन्या आणि देश-विदेशातील तज्ज्ञांना त्यांच्या अद्ययावत मशिनरीसहीत पाचारण करण्यात आले. एकूण ६५२ मनुष्यबळ दुर्घटनेच्या स्थानी दाखल झाले.

खरं म्हणजे, अशावेळी प्राणवायूचा त्वरित पुरवठा ही प्राथमिक गरज असते. ती सुरळीत करण्याचे आवाहन नागपूरच्या वेस्टर्न कोलफिल्ड्सच्या बचाव चमूला सांगण्यात आले. त्या फळीचे जनरल मॅनेजर श्री. दिनेश बिसेन यांनी कोल माईन्स प्लानिंग आणि अभिकल्प संस्थेचे एक माजी दिग्दर्शक श्री. ए.के. राणा यांनी आधीच आखलेल्या अधिकल्पानुसार पुढाकार घेत, वरून खालपर्यंत ड्रिलींग करून ६ इंच व्यासाचे छिद्र पाडले आणि वर एक्झॉस्ट पंखा बसवला. लगोलग यालाच समांतर दुसरा बोगदा खणण्यात आला. आतील प्राणवायूचे प्रमाण वेळोवेळी मोजण्यात येऊन जरूर असेल तेंव्हा पंखा सुरू करून प्राणवायूची योग्य मात्रा राखण्यात यश मिळवले आणि कामगारांना गुदमरून जाण्यापासून वाचवले.

आता दुसरी गरज होती ती कामगारांची तहान भागवण्याची. त्यासाठी ड्रिल केलेल्या छिद्रातून मग्या-मग्याने पाणी ओतून ते चाटून तृष्णा भागवण्याची सूचना करण्यात आली. श्वास आणि तृष्णा यांची पूर्तता झाल्यानंतर पाणसर (पातळ) खिचडी साध्या प्लॅस्टिकच्या बाटल्यांत ओतून ती अडकून पडलेल्या कामगारांपर्यंत पोहोचवण्यात आपत्ती निवारण चमूला यश आले. या प्राथमिक यशानंतर पाणी, अन्न, फळांचा रस, सुका मेवा आदी पदार्थ क्रमाक्रमाने गरजूंना पुरवण्यास सुरुवात झाली. पण हे यश गाठण्यासाठी सुमारे दहा दिवसांचा वेळ लागला! कामगारांना हायसे वाटले. त्यांच्यात तरतरी आली. दिनांक २१ नोव्हेंबर रोजी A-2 टाईप कॅमेरा, जो रुग्णालयात Endoscopy (शरीरातील आतील भाग बघण्यासाठी) साठी वापरण्यात येतो, त्याला पाईपमध्ये टाकून अडकलेल्या मजूरांची स्थिती बघण्यात बचाव चमूला यश आले. यानंतर मजूरांना वॉकी-टॉकी उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे त्यांना सुरक्षा

चमूशी बोलता आले. यामुळे त्यांच्या, तसेच नातेवाईकांच्या मनावरील दडपण कमी होण्यास मदत झाली. सरतेशेवटी अडकून पडलेल्यांना सापशिडी, लुडो आदी सोपे खेळ डाऊनलोड करून मोबाईल फोनसुद्धा पुरवण्यात आले. आता ही मंडळी निवांतपणे या खेळात रमून गेली. अशाप्रकारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य उंचावून ठेवण्यात बचाव चमूला यश आले.

हे सर्व होत असताना, व्हिएन्ना स्थित ऑस्ट्रेलियन तज्ज्ञ श्री. अर्नाल्ड डिक्स आणि मायक्रो टनेल तज्ञ श्री. ख्रिस कूपर यांच्या मार्गदर्शनाखाली बचाव दल ऑगर मशिनीच्या साह्याने मलबा हटवून आणि ८०० एम. एम. व्यासाचे पाईप टाकून श्रमिकांपर्यंत पोहोचण्याच्या कामाला लागले. यात सातत्याने विघ्ने येत होती. हे काम सुमारे ६० मीटर लांबीचे होते. मात्र, ४७ मीटरनंतर ऑगर मशिनीची पाती बोगदा तयार करण्यासाठी वापराव्या लागलेल्या लोखंडी कांबींना आणि राडारोड्याला अडकून एकामागून एक तुटून पडली. इथे सगळेच हरले. आशेची जागा निराशेने घेतली. (Hope turned into dispair).



**पाश्चात्त्य ऑगर मशीनने राडारोडा हटवताना...**

प्रसंग बाका होता. शेवटी ट्रेंचलेस मायनिंग इंजिनीअरिंग सर्विसेस आणि नवयुग कंपनीशी संपर्क साधून उर्वरित काम 'रॅट होल मायनर्स' कडून करवून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामात निष्णात असलेल्या कामगारांना बोलावून घेण्यात आले. हे काम अवैद्य असले तरी अडकून पडलेल्या ४१ श्रमिकांच्या जीवन - मरणाचा प्रश्न होता. त्यांना सुखरूप बाहेर काढण्याचा दुसरा कोणताही पर्याय नव्हता. या कामासाठी प्रवीण यादव या मायनर्सने पुढाकार घेतला. त्याने मुन्ना कुरेशीला सोबत घेतले आणि ८०० एम. एम. व्यासाच्या पाईपातून आत शिरकाव करत गॅस कटरच्या साहाय्याने ऑगर मशिनीसाठी कर्दनकाळ ठरलेल्या लोखंडी कांबी कापून काढल्या. हे अतिशय जोखमीचे कार्य होते. प्राणवायूच्या कमतरतेमुळे ते आव्हानात्मक होते. (या आधी एन. डी. आर. एफ. च्या जवानांनासुद्धा बोगद्यात शिरणे जमले नव्हते.) लोखंडी कांबींचा समाचार घेतल्यावर उर्वरीत १२ मीटरचे काम पाळीपाळीने इतर मायनर्सनी पूर्णत्वास नेत बोगदा २४ तासाच्या आत मोकळा केला आणि आत अडकलेल्या भावंडांपर्यंत



**आत अडकलेल्या श्रमिकांना पहिल्यांदाच बघणारा रॅट होल मायनर**

पोहोचण्यात यश मिळवले. २८ नोव्हेंबरच्या दुपारी ३ वाजता सुरू झालेले हे काम २९ नोव्हेंबरच्या पहाटे ७ वाजेपावेतो सुरू होते. ठीक ७.३० वाजता अधिकृतपणे ही बातमी जगाला कळविण्यात आली. देशात आणि जगात एकच जल्लोष उडाला.

यानंतर लागलीच एन. डी. आर. एफ. च्या जवानांनी मायनर्सची जागा घेतली आणि एक- एक करून सर्वच श्रमिकांना बाहेर काढले.

आता 'रॅट होल मायनर्स' ही काय संकल्पना आहे?, बंदी असूनही त्यांचा या कामासाठी का बरे

उपयोग करण्यात आला?, तिचा आणखी कुठे वापर होतो?, या बाबत सविस्तर माहिती जाणून घेऊ. उंदरांची माती पोखरून बिळे तयार करण्याची पद्धत आणि मायनर्सची फक्त फावडा, लहानशी कुदळ व कांही पिशव्या यांच्या सहाय्याने केलेले खणण यात कमालीचे साम्य असल्याने 'रॅट होल मायनर्स' हे नांव रूढ झालेले आहे. याचा उपयोग मुख्यत्वे मेघालय आणि झारखंड राज्यात कोळसा आणि इतर खनिजे काढण्यासाठी होत असतो. ही पद्धत मुख्यतः झारखंडमधील बंद झालेल्या भूमिगत खाणी आणि मेघालयात डोंगर - उतारावर पण जमिनीच्या आत खोलवर दगडी कोळशाचे कमी जाडीचे (२ ते ३ फुट) थर खणण करून बाहेर काढण्यासाठी वापरण्यात येते. यात एकच माणूस उतरू शकेल एवढा खड्डा तयार करून, त्यातून हळूहळू पण पद्धतशीरपणे खणण केले जाते. कधीकधी १० बाय १०० मीटर (बॉक्स) असा मध्यभागी विहीरवजा खड्डा खोदून त्यात कोळसा वा इतर उपयुक्त खनिजे आढळल्यास या खड्ड्यात दोर किंवा बांबूच्या साहाय्याने कामगारांना आत सोडले जाते. त्यानंतर आडवे बोगदे तयार करत खणण करण्यात येते. या खणणात कित्येकदा श्वास घ्यायला जागा नसते. त्यामुळे गुदमरून वा पावसाळ्यात वरचे पाणी खड्ड्यात अचानक जमा झाल्याने मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. तो कामगारांच्या सुरक्षेचा कळीचा मुद्दा ठरून २०११ साली माईन्स सेफ्टी विभागाने अशा खणणावर बंदी घातली. तसेच, असे खणण पर्यावरणासही हानीकारक असल्याने हरीत लवादानेसुद्धा त्यास मनाई केली आहे. असे असतानाही, रॅट होल मायनर्सची मदत का घेण्यात आली, याविषयी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकारी निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हुसैन म्हणतात, 'हे काम अवैध असले तरी अडकलेल्या ४१ मजूरांना मृत्यूच्या कराल दाढेतून सुखरूप काढण्यासाठी या रॅट होल मायनर्सना विनंती करण्यात आली आणि त्यांनीसुद्धा हे आव्हानात्मक काम तडीस नेत अडकलेल्या मजूरांची सुटका केली आणि तीही २४ तासांच्या आत पूर्णत्वास नेऊन इतिहास रचला.'

या मोहिमेत सहभागी झालेल्या रॅट मायनर्सची नांवे अशी :- प्रवीण यादव, मुन्ना कुरेशी, जतीन अहमद, अंकूर, फिरोज अहमद, रशीद, इर्शाद, सोनू, देवेंद्र ,नदीम, सौरभ, नजीर. या सर्व शिलेदारांना माझा, तुमचा आणि सगळ्यांचा आदरयुक्त मानाचा मुजरा!


काही असो, मग्याने पाणी ओतून दगडधोंड्यांना ओलसर करून ते पाणी श्रमिकांना चाटून तृष्णा भागवण्यासाठी सांगणे, प्लॅस्टिकच्या बाटल्यांतून पातळसर अन्न, फळांचा रस, सुका मेवा गरजूपर्यंत पोहोचवणे, कामगारांचे मनोधैर्य टिकवण्यासाठी वॉकी - टॉकीद्वारे बोलणे करणे, सेलफोनमध्ये लुडो व सापशिडीसारखे साधेसुधे खेळ लोड करून त्यात त्यांची मने गुंतवणे, शेवटी जेव्हा आधुनिक यंत्रणा हतबल ठरली तेंव्हा फक्त लहान कुदळ, फावडा आणि कांहीं पिशव्या यांच्या सहाय्याने ढिगारा उपसून अडकलेल्या मजूरांपर्यंत पोहोचणे, अशा भन्नाट कल्पना डोक्यात येणे आणि त्या सफलतेने क्रियांन्वीत करणे या सर्व बाबी साध्या वाटत असल्या तरी त्यामुळे भारत हा क्रियाशील डोकेबाजांचा, कृतीशील हातांचा व या दोहोंच्या समन्वयातून उपयुक्त जुगाड बांधून, न घाबरता प्रयत्नरत राहणाऱ्या जिगरबाजांचा आहे, हे अधोरेखित होते. अशा सिद्धहस्त बांधवांच्या प्रयत्नांमुळेच भारत नजिकच्या काळात विकसित देश होईल, यात शंका नाही.

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

•••

# डॉ. आनंद कुलकर्णींच्या 'रोलां बार्थ' पुस्तकाविषयी

*समीक्षक डॉ आनंद कुलकर्णी यांनी पाश्चात्त्य साहित्य समीक्षक रोला बार्थ यांच्यावर पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे पुस्तक परीक्षण ज्येष्ठ अभ्यासक रोहित कावळे यांनी प्रस्तुत लेखात केले आहे : संपादक*




अनेकजण प्रतीक्षा करीत असलेलं कुलकर्णी सरांचं बार्थवरचं पुस्तक एक वर्षांपूर्वीच आलं. त्याला त्यांनी 'पुस्तिका' म्हटलं आहे, ते पृष्ठसंख्येच्या दृष्टीने बरोबर आहे, पण आशयाच्या बाबतीत तो ग्रंथ आहे!

मराठीत समकालीन थिअरीजबद्दलची पुस्तकं फार कमी आहेत. त्यातून, अशा एकाच थिअरिस्ट/विचारवंताच्या लेखनकार्याची, सिद्धांताची ओळख करून देणारं पुस्तक कुठलं आहे का, मला माहीत नाही. इंग्रजीत अशा प्रकारची पुस्तकं आहेत. विद्यार्थी आणि अभ्यासकांसाठी बार्थची ओळख करून देणारं असं छोटं, सोप्या भाषेतलं पुस्तक लिहिणं हे खूपच अवघड काम होतं. पण कुलकर्णी सरांच्या इतक्या वर्षांच्या सखोल अभ्यासामुळे त्यांनी हे आव्हान लीलया पेललं आहे.

जवळपास सत्तर पानांमधे बार्थचा जीवनपरिचय, त्याची विचारसूत्रं, लेखनविषयक विचार, त्याची चिन्ह-मीमांसा आणि संहिताविषयक विचार, एवढं सगळं मांडलेलं आहे - कुठेही घाईगडबडीत गुंडाळल्याची भावना आपल्या मनात न आणता. प्रास्ताविकात त्यांनी आज बार्थचा अभ्यास का करायला हवा, त्याचं समर्पक स्पष्टीकरण थोडक्यात दिलं आहे. तिथेच आपल्याला बार्थच्या विचारांचा आवाका कळतो, आणि कुलकर्णी सरांच्या अभ्यासाचाही. बार्थनी मूलगामी चिंतन केलेल्या संहिता आणि आंतरसंहिता या संकल्पना आजही साहित्याच्या अभ्यासात महत्त्वाच्या आहेत, आणि कल्चरल स्टडीज या नव्याने उदयाला आलेल्या अभ्यासक्षेत्रातील जवळपास सर्व संकल्पनांचं मूळ बार्थच्या पुस्तकांमधे दिसतं, असं ते सांगतात. बार्थचा अल्प जीवनपरिचय करून देतानाही त्याचा संबंध ते बार्थच्या वैचारिक प्रवासाशी जोडतात. उदा. बार्थच्या लहानपणीच त्याचे वडील वारले. त्याबाबतीत बार्थ एकदा म्हणाला की, 'त्याला फ्रॉइडिअन बालपण जगता आलं नाही.' वडिलांना विरोध करायला न मिळाल्यामुळे तो रूढीग्रस्त विचारांना, पारंपरिक संकल्पनांना विरोध करू लागला. त्यांना तो वडिलांच्या जागी विरोधक मानत होता!

बार्थची विचारसूत्रं मांडताना, त्याचे लेखनविषयक विचार, त्याची चिन्ह-मीमांसा आणि संहिताविषयक विचार आणि आपण बार्थकडून काय शिकणार, अशा चार भागांमधे मांडली आहेत. हे प्रकरण पुस्तकाचा गाभा आहे. सुरुवातीला बार्थनी त्याच्या आत्मचरित्रात केलेल्या वेगळ्या प्रयोगाबद्दल कुलकर्णी सर आपल्याला सांगतात. त्याचे लेखनविषयक बंडखोर विचार विशद

करताना एक महत्त्वाचा मुद्दा येतो, तो म्हणजे 'साहित्य परंपरेच्या प्रभावापासून पूर्णपणे मुक्त असलं पाहिजे.' असं लेखन शक्य आहे का? बार्थ हा कमूच्या 'दि आउटसायडर' पुस्तकातील मेर्सोचं उदाहरण देतो.

बार्थचं भाषेविषयी चिंतन मूलगामी होतं. उदा. भाषा अंगभूतपणेर वर्चस्ववादी आणि हिंसक असते, हा विचार. मग अशा भाषेत केलेलं लेखन मुक्तपणे आपला स्वतंत्र विचार व्यक्त करू शकेल का, यावर चिंतन करताना त्यानी असं मांडलं की, प्रस्थापित लेखन ('डॉक्सा') आणि परंपरेविरोधी लेखन ('पॅराडॉक्सा') हे दोन्ही प्रकारचं लेखन आपले विचार समाजावर लादायचं काम करतात. बार्थचा तटस्थ लेखनाबद्दलचा विचार त्याला उत्तरसंरचनावादी विचारांकडे घेऊन जातो, असं कुलकर्णी सर दाखवून देतात. बार्थच्या लेखनप्रवासातले धागेदोरे सरांनी अचूक पकडले आणि मांडले आहेत. मोठ्या चित्राचा पूर्ण कॅनव्हास पाहिल्यावर आणि तो उमजल्यावर असे अंडरकरंट्स दाखवता येतात. ते वाचताना आपल्याला एका चित्रासारखं सलग वाटत असलं, तरी असं jigsaw puzzle जुळवण्यासाठी कुलकर्णी सरांसारखी विचारसाधना असावी लागते.

बार्थची चिन्ह-मीमांसा मांडताना, संकेत, चिन्ह आणि प्रतीकं या त्याच्या संकल्पना सरांनी सोप्या उदाहरणांच्या साहाय्यानी स्पष्ट केल्या आहेत. सोस्यूरच्या संरचनावादाचा बार्थवर प्रभाव होता. पण तिथेच न थांबता, त्यानी चिन्ह-मीमांसा मांडली. दोन्ही परस्परपूरक आहेत, पण बार्थ संरचनावादाचा उपयोग साहित्यिक कथनांसाठी करतो आणि चिन्ह-मीमांसेचा उपयोग चिन्ह व्यवस्थांच्या अभ्यासासाठी. उदा. छायाचित्रं, चित्रपट, जाहिरात, कपडे इ. मिथकं चिन्हांचा शब्दशः अर्थ बदलून त्यांना वेगळाच अर्थ प्राप्त करून देतात. कुस्ती, फॅशन हीसुद्धा मिथकंच आहेत. बार्थ हा सोस्यूरची संरचनावादी संकल्पना मिथकांना लावतो. सोस्यूरच्या मते चिन्हाला निश्चित आणि एकच अर्थ असतो, तर मिथकं अनिश्चित आणि अनेक अर्थ सांगतात, हा महत्त्वाचा फरक आहे. बार्थवर सोस्यूरचा प्रभाव कसा पडला, आणि कुठे तो सोस्यूरच्या पुढे गेला, हे सरांनी थोडक्यात आणि नेमकेपणानी मांडलं आहे.

बार्थच्या संहिताविषयक विचारांमधे तो संरचनावादी राहात नाही, तर उत्तरसंरचनावादी होतो. त्याच्यावर जुलिया क्रिस्तेव्हा या विदुषीच्या संहिताविषयक विचारांचा प्रभाव पडला हे सांगताना कुलकर्णी सर आधी क्रिस्तेव्हाच्या विचारांचा थोडक्यात आढावा घेतात. त्यासाठी बाख्तिनचे भाषेविषयीचे विचार समजून घ्यावे लागतात! (पुन्हा धागेदोरे!) बाख्तिन भाषेचा प्रत्यक्ष उपयोग - 'परोल' - हाच भाषेचा अभ्यासविषय मानतो, कारण त्याच्या मते भाषा नेहमीच डायलॉजिक असते. ही गोष्ट क्रिस्तेव्हा बाख्तिनकडून शिकली. त्या प्रेरणेतून तिला आंतरसंहिता ही संकल्पना सुचली. क्रिस्तेव्हाच्या प्रभावातून बार्थनी संहितेची जी संकल्पना मांडली, त्यानुसार संहिता एकमेव, स्थिर, निश्चित अर्थ वाचकांना सांगत नाही. इथे आपल्याला त्याच्या आणि देरिदाच्या मांडणीत साम्य दिसतं.

बार्थनी संहितेचा विचार 'टेक्स्ट' या शब्दापासून केला. टेक्स्ट हा शब्द प्राचीनकाळी 'कापड विणणे' या अर्थानी वापरला जायचा. 'संहिता ही अनेक धाग्यांची शृंखलाच. कोणतीही संहिता आधीच अस्तित्त्वात असते, लेखक फक्त उपलब्ध भाषेच्या साधनांमधून हवी तशी जुळवाजुळव करतो', हा बार्थचा विचार पारंपरिक अभ्यासकांना धक्का देऊ शकतो. 'लेखकराव' तर जाऊच द्या; पण साहित्याच्या केंद्रस्थानी असलेलं लेखकाचं स्थानच बार्थनी 'Death of the Author' या त्याच्या निबंधातून नाकारलं. साहित्यकृती आणि संहिता यात बार्थनी केलेला फरक स्पष्ट करण्यासाठी कुलकर्णी सरांनी इंदिरा संतांच्या 'कौतुक' या कवितेचं विश्लेषण केलेलं

प्राप्तीपेक्षा 'प्रयत्नांचा' आनंद अधिक असतो.

आहे, ते साहित्याच्या अभ्यासकानी वाचायलाच हवं! कवितेतल्या काही शब्दांचे वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळे वाच्यार्थ, संकेतार्थ उलगडून, संहिता म्हणून साहित्यकृतीकडे पाहिल्यावर कशा नव्या संहिता जन्माला येतात आणि वाचकांचे लेखक होतात, हे त्यांनी या उदाहरणातून स्पष्ट केलं आहे, ते वाचायलाच हवं. कुलकर्णी सरांचं हे महत्त्वपूर्ण योगदान साहित्याच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त तर आहेच, पण आपला अभ्यास कुठपर्यंत जायला हवा, त्याचा एक मापदंड आहे.

या प्रकरणाच्या शेवटी आपण बार्थकडून काय शिकायला हवं, ते स्पष्ट केलं आहे. त्याच्या विचारांचा प्रभाव साहित्य, भाषा, संप्रेषण, समाज आणि संस्कृती यांच्या बाबतीत झाला आहे, हे नमूद करून, मुख्यत्वेकरून तीन गोष्टी आपण शिकू शकतो हे मांडलं आहे - १. आपण जुन्या, पारंपरिक विचारांच्या बेड्यात न अडकता चिकित्सक विचार करणं शिकलं पाहिजे. २. कोणत्याही विचाराला घट्ट चिकटून बसायचं नाही. उदा. बार्थनी भांडवलवादी उजव्या विचारसरणीला विरोध केलाच, पण डाव्या विचारसरणीतले दोषही मांडले. ३. नावीन्य आणि कल्पकता. फॅशन, जाहिरात, कुस्ती अशा गोष्टींचं त्यानी केलेलं विश्लेषण अगदी वेगळं आहे.

पुस्तकाच्या शेवटी सरांनी संदर्भ-ग्रंथांची सूची दिली आहे, ती जिज्ञासू अभ्यासकांना आणखी विस्तृत, सखोल अभ्यासासाठी अतिशय उपयुक्त आहे. पुस्तकात अर्धवट आणि अपूर्ण अशी एक गोष्ट आहे, ती म्हणजे लेखकाचा परिचय! अर्थात, प्रकाशकांचा काही दोष नाही. सरांनी जो स्वतःचा factual परिचय दिला असेल, तो त्यांनी छापला! पण त्यापलीकडे बरंच काही सांगण्यासारखं आहे. कुलकर्णी सर वयानी माझ्याहून लहान आहेत, पण साहित्य आणि समीक्षा, थिअरी यांच्या अभ्यासाच्या बाबतीत ते माझ्यासाठी एक आदर्श आहेत. त्यांचं वाचन अफाट आहे, आणि अभ्यास दांडगा आहे. ड्रामा आणि थिअरी यांच्या अभ्यासावर त्यांचा अधिकार आहे. त्यांची मतं स्पष्ट आणि सडेतोड असतात. ते जितक्या तळमळीने शिकवतात, तितक्याच तळमळीने फेसबुक आणि इतर माध्यमांतून त्यांचं विश्लेषण शेअर करतात. आपण जे काही करतो, त्यातून काही निष्पन्न होतंय की नाही, याचा ते सतत विचार करतात. शिक्षणक्षेत्राबाहेरच्या भौतिक लाभांचा तर त्यांना मोह नाहीच, पण रिसर्च गाईड होणं इत्यादी शैक्षणिक क्षेत्रातल्या काही लोकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींमधला फोलपणा जाणवल्यावर त्यांनी त्या सहजपणे सोडून दिल्या. (मी त्यांना एकदा गमतीने म्हणालो, 'नोकरी, संसार आणि आयुष्य यातून तरी विरक्ती जाहीर करू नका!')

त्यांच्या पुस्तक-मालिकेतलं हे पहिलं आहे. अशी आणखीही पुस्तकं येतील. आम्ही वाट पाहतोय. त्यांचं आणि प्रकाशकांचंही अभिनंदन! पुस्तकातली रेखाचित्रं, मांडणी हेही छान आहे.

'रोलां बार्थ : लेखन, चिन्हमीमांसा आणि संहिता' - डॉ. आनंद कुलकर्णी

अपना मुक्काम पैदा कर प्रकाशन, औरंगाबाद

मूल्य - २०० रुपये

**- डॉ. रोहित कावळे**
ज्येष्ठ अभ्यासक
पुणे

*दिशा संपर्क दूरध्वनी*

**०२२-२५४२ ६२७०**

# साहित्यकृती : एक स्फुट चिंतन

*साहित्यकृतीच्या आकृतीबंध व आशय संपन्नतेला केंद्रभूत ठेवून काही स्फूट समीक्षा सिद्धांत प्रस्तुत लेखात ज्येष्ठ समीक्षक डॉ. आनंद कुलकर्णी यांनी मांडले आहेत – संपादक*

१. साहित्य जी वाट धरेल, जो आकृतीबंध स्वीकारेल आणि जो आशय व्यक्त करेल, तशी समीक्षाही तिची अन्वेषण पद्धती बदलत असते. साहित्य जेवढे आशयसंपन्न, जेवढे समग्रतेचा ध्यास असलेले आणि अस्तित्वाच्या गुंत्याला अभिव्यक्त करणारे असते, तेवढीच समीक्षाही असते. साहित्य आणि समीक्षा एकमेकांशी फटकून वागणारे किंवा काडीमोड घेणारे नसतात. ते परस्परावलंबी असतात. म्हणून साहित्य जितकं दर्जेदार, आशयघन आणि प्रयोगाभिमुख तितकी समीक्षाही दर्जेदार होत जाते.

२. साहित्यकृती अनन्य असते. म्हणजे परंपरेच्या खुणा तिच्यावर असतात; पण ती परंपरेने जखडली जात नाहीत. परंपरेने अधिग्रहित केलेल्या/ व्यापलेल्या निर्मितीच्या चौकटबंद प्रदेशात मुक्त श्वास घेण्याइतका अवकाश साहित्यकृती मिळवतेच. मगच तिचं पृथगात्म असणं सिद्ध होतं. हा मुक्त अवकाश जेवढा मोठा तेवढी साहित्यकृती दर्जेदार असते.

३. साहित्यकृतीला हा मुक्त अवकाश कसा मिळवता येतो? साहित्यकृतीचा सर्जक/निर्माता जेव्हा साहित्यकृतीतून वजा होतो/होते तेव्हा हा मुक्त अवकाश मिळतो. साहित्यकृतीने वाचकाला लेखकाकडे नेता कामा नये. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर, 'लेखकाने साहित्यकृतीला खाजगी मालमत्ता समजून स्वत:भोवती फिरवत ठेवू नये!' उदाहरणार्थ; कवितेने वाचकाला कवीकडे न नेता कवितेतच गुंतवून ठेवायला हवं. यासाठी साहित्यकृतीने आशयनिष्ठ व्हायला पाहिजे. ही आशयनिष्ठता म्हणजेच वस्तुनिष्ठता असते. आशयाऐवजी निव्वळ अलंकारिक आभूषणं किंवा व्यक्तीगत आवडी/निवडी यांचं वर्चस्व वाढलं की, साहित्यकृती उथळपणे देखणी आणि व्यक्तीनिष्ठ होते. मग साहित्यकृतीला परंपरेचा आणि व्यक्तीनिष्ठतेचा दुहेरी काच होतो.

४. पारंपरिक साहित्यकृती व्यक्तीनिष्ठ होती. त्यात लेखकाच्या अनुभवांना प्राधान्य होतं. अनुभवांचं आशयद्रव्यात रूपांतर करता आलं नाही की मग साहित्यकृतीत जागोजाग लेखक दिसतो, लेखन नाही. पाश्चात्त्य रोमँटिसिझमच्या काळात बव्हंशी असं साहित्य होतं. काही वेळा जॉन किट्ससारखा कवी त्याच्या व्यक्तीगत अनुभवाला आशयात रूपांतरित करण्यात यशस्वी होतो आणि मग त्याचे Odes कविता म्हणून समृद्धपणे वाचकांच्या समोर येतात.

५. २०व्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य साहित्यातील व्यक्तीनिष्ठा क्रमश: कमी होत गेली. साहित्य अधिकाधिक आशयप्रधान होत गेलं आणि वस्तुनिष्ठ होत गेलं. मनाचा खोल तळ शोधणे, अस्तित्वाचे प्रयोजन शोधणे, अस्तित्वातील गुंते मांडणे अशा अंगाने आशय व्यक्त होत राहिला. हा एकाबाजूने झालेला प्रवास होता. दुसऱ्या बाजूने

साहित्य आशयप्रधान होताना समूहनिष्ठ होतं गेलं. सामाजिक, राजकीय वास्तव साहित्यात उमटत राहिले. यातही लेखक खूप महत्त्वाचा होता असं नाही. महत्त्वाचा होता तो समाजवास्तवाने भरलेला आशय.

६. आशयाची ही वस्तुनिष्ठता आणि समाजनिष्ठता २० व्या शतकाच्या मध्यावर साहित्याच्या स्वरूपाकडे सरकली. सैद्धांतिक समीक्षेची ही सुरुवात होती. आणि ती तशी होती कारण साहित्यकृतीही स्वत:चं निरीक्षण/परीक्षण करणारी self-reflexive होत चालली होती. Rene Wellek आणि Austin Warren यांचा 'Theory of Literature' हा समीक्षा ग्रंथ याचं प्रातिनिधीक उदाहरण म्हणून सांगता येईल. आत्तापर्यंत साहित्यकृतींशी संबंधीत गोष्टींची चर्चा करणारी समीक्षा आता साहित्याच्या अस्तित्वाविषयी प्रश्न विचारती झाली. साहित्य म्हणजे काय, त्याचं स्वरूप आणि प्रयोजन काय असे प्रश्न महत्त्वाचे ठरले. पुढे जाऊन हे सगळं भाषेशी जोडलं गेलं. आशय ज्यातून व्यक्त होतो ती भाषा काय आहे याची चिकित्सा सुरू झाली. समीक्षा भाषाभिमुख झाली. अर्थात साहित्यानेही भाषेचा सजग आणि प्रयोगशील वापर करायला सुरुवात केली होती. विघटित, क्लिष्ट, दुर्बोध, अर्थाला हद्दपार करणारी भाषा साहित्यात येत राहिली. मग समीक्षाही तशीच होत राहिली. 'साहित्य म्हणजे भाषिक रचना' अशी चिकित्सा होत राहिली.

७. सैद्धांतीक समीक्षा अनेक अंगांनी पुढे जात राहिली. समाजनिष्ठ मार्क्सवादी, सांस्कृतिक, नवऐतिहासिक, उत्तर आधुनिक समीक्षा तशीच रूपनिष्ठ, संरचनावादी आणि उत्तर संरचनावादी समीक्षा असे प्रवाह जोमदारपणे साहित्याची चिकित्सा करीत राहिले.

८. हे सगळं होताना पाश्चात्त्य साहित्याने सतत कात टाकली, नव्या वाटा शोधल्या. आशय, भाषा, शैली, तंत्र अशा सर्व घटकांसोबत प्रयोग होत राहिले. साहित्य म्हणजे काय हा प्रश्न सर्वांगाने तपासला गेला. या प्रश्नाचे सोयीस्कर उत्तर यायला पाहिजे अशी मांडणी कोणी केली नाही. चिकित्सा चालत राहिली. कला/साहित्य यांचं स्वरूप, प्रयोजन, कार्य यांच्याशी संबंधित अनेक शक्यता तपासल्या गेल्या. अंतिम उत्तराची किंवा सोडवणुकीची घाई किंवा मुद्दाम घडवून आणलेली मांडणी केली गेली नाही. असा अनाठायी आणि तकलादू प्रयत्न कोणी केलाच, तर त्याचीही चिकित्सा होत राहिली, साहित्य/कलेविषयी आणि साहित्य/कलेचा प्रश्न सतत विचारला गेला, जातो आहे. या प्रश्नाची समीक्षा एखादा समीक्षक जिथे आणून सोडतो तिथून दुसरा ती पुढे नेतो आणि हे असं चालत राहतं.

९. मुद्दा हा की, असं मराठी साहित्यात घडलंय का, घडतंय का? व्यापक, प्रश्नार्थक, प्रयोगशील अशी साहित्यनिर्मिती मराठीत होतेय का? तसं नसेल तर मग तशी समीक्षा व्हायचीही शक्यता नाही. समीक्षा सक्षम व्हायला साहित्य सक्षम लागतं. अशी समृद्ध समीक्षा मग साहित्याची चिकित्सा तर करतेच, पण साहित्याला नव्या वाटाही दाखवते!


**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४

●●●

# स्मरणीय अंदमान

*अंदमान म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वास्तव्याने पावन झालेले तीर्थस्थान; तसेच निसर्गाने देखील भरभरून दान दिलेला हा प्रदेश. नुकत्याच झालेल्या अंदमान यात्रे संदर्भात ज्येष्ठ पत्रकार श्री. समीर कर्वे यांनी लिहिलेला लेख खास दिशाच्या वाचकांसाठी – संपादक*





बऱ्याच वर्षांपासून मनांत असलेल्या अंदमान सफरीचा योग यावर्षी जुळून आला. अंदमानचं रूप हे अपेक्षेपेक्षा खूप वेगळं आणि अधिकच स्फूर्तीदायी, आशादायी होतं. त्याचं कारण म्हणजे इथे झालेला पर्यटन उद्योगाचा सध्याचा विस्तार. या भेटीतली काही क्षणचित्रं तुमच्याशी छायाचित्ररूपात शेअर करत आहे. मराठी माणसाच्या मनात अंदमानचा सांधा वर्षानुवर्षं जुळून राहिला, त्यातला मूळ दुवा म्हणजे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर. साहजिकच टूरचा प्रारंभ पोर्ट ब्लेअरमध्ये स्वा. सावरकरांच्या स्मृतींना वंदन करून झाला. 'तुजसाठी मरण ते जनन' या ओळी स्वातंत्र्यवीरांच्या किती अंगाअंगात भिनल्या होत्या, त्याची सेल्युलर जेल पाहताना पदोपदी साक्ष पटत होती. कोलू चालवणं, अंगावर मारलेले फटके, एका छोट्या झरोक्याव्यतिरिक्त काहीही नाही आणि फूटभर जाडजूड भिंतीत रोवलेली तितकीच जाडजूड लोखंडी कडी असलेला दरवाजा यांच्यातली कोठडी आणि समोर मृत्यूदंडाचं कायम दिसणारं भयकारी रूप अशा कोठडीत स्वातंत्र्यवीरांनी किती हालअपेष्टा काढल्या, ते साक्षात समोर दिसू लागतं. या कोठडीत 'जयोस्तुते' हे सावरकररचित गीत म्हणताना सर्वांचंच हृदय हेलावून गेलं होतं. लाइट अन्ड साऊन्ड शो, सेल्युलर जेलची भेट याबरोबरच सावरकर केंद्राच्या कोषाध्यक्ष मंजिरी मराठे यांचे कथन यामुळे ही सर्व भेट अधिकच रोमांचकारी ठरली. स्वा. वि. दा. सावरकर, बाबाराव सावरकर, तसंच पंजाब, बंगाल व भारतभरातील शेकडो स्वातंत्र्यसेनानींपुढे नतमस्तक होत या भारतभूमीशी आमची ओळख होऊ लागली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी प्रथम फडकावलेल्या भारतीय ध्वजाच्या स्थळी गगनचुंबी तिरंग्याला हिंदी महासागराच्या साक्षीने सलामी देत एक रम्य सायंकाळ अनुभवण्यास मिळाली. हिमश्री टूर्सच्या देवेंद्र गन्द्रे यांच्या नेतृत्त्वाखाली ३६ जणांच्या समूहातून मी, मृदुला आणि तन्मय असे तिघे अंदमानला गेलो होतो. रामंदिर प्राणप्रतिष्ठेच्या सोहळ्याच्या दिवशी पोर्टब्लेअरमध्ये असल्याने मनमाड, इंदूर, पुणे, मुंबई अशा विविध ठिकाणांहून आलेल्या यात्रींनी श्रीरामपूजनाचा सोहळाही उत्साहाने केला.



लबाडी ही तोकड्या चादरीसारखी असते; तोंडावर ओढून घ्यावी तर लगेच खाली पाय उघडे पडतात!

ब्रिटिशांनी भारतावर आणि अंदमानसारख्या अद्भुत प्रदेशावर राज्य करताना कित्येक वर्षांच्या तयारीने पाय रोवले होते. त्यामुळेच रॉस आयलंड या बेटावर निवासाचे बंगले उभारतानाही इंडोनेशियाच्या फर्निचरपासून अनेक वस्तूंचा जामानिमा तिथे आणला होता. इथे पाणी उकळून पिण्यासाठी डिस्टिलरी प्लॅन्टही त्यांनी उभारला होता. पोर्ट ब्लेअरमधून स्पीडबोटीने पंधरा मिनिटांत या बेटावर पोहोचता येतं. तिथे येताच हरणांचे कळप आपलं स्वागत करतात. अंदमान बेटांसभोवती समुद्री जीवन विपुल आणि संपन्न असलं, तरी तिथे जमिनीवरचे वन्यजीव मात्र तिथल्या हवामानामुळे फार वाढलेले नाहीत. हरणं असली, तरी त्यांच्यावर जगणारी वाघांसारखी श्वापदं इथे नाहीत. इथला निसर्ग, इथली हरणं, खारुताई, मोर यांच्याशी अनुराधा राव यांचं खास नातं आहे. वयाच्या सत्तरीतही त्या दररोज आपली खाऊने भरलेली सॅक पाठीशी घेऊन रॉस आयलंडवर येतात. ‘माझा भारतभूमीवर राग नाही, परंतु निसर्ग, वारसावैभव यांचा विध्वंस करणाऱ्या आपल्या भारतीयांच्या दुष्प्रवृत्तीचा मात्र मला तिटकारा आहे’, असं अनुराधाताई पोटतिडकीने सांगतात. कुणी हरणांच्या जिवाशी खेळ करायला जंगलात जाऊ लागला, तर त्या अक्षरशः किंचाळून दरडावतात. मात्र परी, राजू यासारख्या नावांनी हाक मारत आपल्याभोवती खारुताई, मोर, हरणांना लगेच गोळा करतात. पोर्ट ब्लेअरमध्ये खास तयार करून आणलेला पाव या सर्वांना भरवतात. आपल्यालाही त्याचा आनंद घ्यायला देतात. रॉस आयलंडच्या भेटीत अंदमानच्या निळ्या-मोरपिशी रंगाच्या समुद्राचं विहंगम दर्शन झालं. पुढचे तीन-चार दिवस हा मोरपिशी रंगाचा समुद्र आपल्याला साथ करणार हे सुखावणारं होतं. आदल्याच रात्री भारतीय नौदलातील कॅप्टन परेश कवळे, नीलिमा कवळे यांच्याशी भेट झाली होती. इथे आपलं नौदल, तटरक्षक दल, हवाई दल, लष्कर अशा चारही दलांचा संयुक्त तळ (युनिफाइड कमांड) आहे. हिंदी महासागरात अत्यंत मोक्याच्या स्थळी असलेल्या या बेटांच्या समूहातील पोर्ट ब्लेअरवर ही कमांड आहे. पावसाचे चार महिने भरपूर पावसाळा आणि उरलेल्या महिन्यांमध्ये आर्द्र, गरम हवामान, डिझेलवर तयार होणारी वीज, फळभाज्या-दुधापासून सर्व काही चेन्नई-बंगालमधून आणावं लागतं. या सर्व प्रतिकूलतांशी जुळवून घेत इथलं पर्यटन मात्र बहरत आहे. रस्ते चांगले झाले आहेत. हॉटेल्स आणि तिथला आहार यांचीही घडी बसली आहे.

### अंदमानच्या समुद्राखालील रमणीय दुनियेविषयी

अंदमानचा आजवरचा गडद निळा आणि मोरपिशी रंगाचा समुद्र छायाचित्रांमध्ये पाहिला होता. त्या मनमोहक रंगांचं पहिलं दर्शन रॉस आयलंडच्या भेटीत झालं होतं. मात्र या मोहक समुद्राच्या उदरात किती अद्भुत आणि विविधरंगी जीवन दडलेलं आहे, त्याचं प्रत्यंतर हॅवलॉक आयलंड म्हणजेच स्वराज द्वीपच्या भेटीत आलं. पोर्ट ब्लेअरसभोवतीच्या भेटी संपल्यावर आम्ही आटोपशीर सामानासह एका क्रूझने स्वराज्य द्वीपकडे कूच केली होती. क्रूझमधून उतरल्यावर मिनी बसने आम्ही काला पत्थर समुद्रकिनाऱ्याकडे जाऊ लागलो. इथली घरं, हॉटेल्स यांचं रूप थोडं पुद्दूचेरी, महाबलीपूरम किंवा गोव्याच्या काही वाड्यांसारखं होतं. बाईक भाड्याने देण्याविषयीचे फलक दिसत होते. सुपारीच्या उंचच उंच झाडांचं बन दिसत होतं. या पोफळीच्या झाडांचे बुंधे जरा पांढरट रंगाचे होते. बीचवर परिधान करण्याचे रंगीबेरंगी बर्म्युडा, आदी कपडे काही ठिकाणी विक्रीस दिसत होते. काला पत्थर बीचवर आम्ही गेलो, तेव्हा अंदमान टूरमध्ये प्रथमच वाळूला पदस्पर्श झाला आणि समुद्राच्या लाटांशी कधी गट्टी झाली ते कळलंही नाही. इथून मग आम्ही आमच्या टीएसजी ब्लू रिसॉर्टकडे मोर्चा वळवला. रिसॉर्टबाहेरच वाळूचे पाय धुण्यासाठी सोय होती. आतमध्ये लाकडी बांधकाम असलेले छोटे बंगले, इमारती असं रिसॉर्टचं रूप होतं. इथून जगप्रसिद्ध

सुखापेक्षा दुःखामुळेच दोन हृदये अधिक जवळ येतात,
म्हणूनच समदुःख हे समआनंदापेक्षा अधिक बलशाली असते.

राधानगर बीच अगदी दहा मिनिटांवर होता. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही एलिफंट बीचकडे जाण्यासाठी निघालो. स्पीडबोटीचा प्रवास करण्यापूर्वी तिथल्या राइड्सविषयी बोटवाल्याने माहिती दिली. स्नॉर्केलिंग, सीवॉक, स्कूबा अशा सर्व ॲक्टिव्हिटीज करण्याविषयी उत्कंठा तर होतीच, पण आपल्याला पाण्याखाली रहायला जमेल ना, अशी धाकधूकही होती. पेमेन्ट केलेल्या राइड्स करवून घ्यायची जबाबदारी त्या त्या बोटवाल्याकडे होती. स्नॉर्केलिंग काय असतं, त्याचा अनुभव इथे आला. स्नॉर्केलिंगमध्ये मास्कला लावलेल्या भिंगामुळे समुद्राखालचं अद्भुत जग अगदी हातात आलं होतं. निमो, झेब्रा हे मासे अवतीभवती नाचत होते. प्रवाळांचे तर विविध प्रकार आणि त्यातून मार्ग काढत आमचा कळप ते गाइड घेऊन जात होते. त्यानंतर काचेचा तळ असलेल्या डॉल्फिन बोटीतून प्रवाळ आणि माशांची रंगमयी दुनिया अधिक विस्ताराने पहायला मिळाली. यानंतर सीवॉक हा एक रोमांचकारी अनुभव आम्ही घेतला. एका फलाटावर सविस्तर ब्रीफिंग झालं. त्यानंतर डोक्यावर ४० किलो वजनाचं हेल्मेट लावून त्यातून कृत्रिम प्राणवायूची तजवीज केल्यावर आम्ही शिडीने समुद्राखाली उतरलो. उतरताना कानांत भरपूर दडे बसतील याची कल्पना आधीच दिलेली होती. काही भीतीदायक वाटल्यास कसा इशारा करायचा, तेही सांगितलेलं होतं. इथे पाणबुडे साथीला होते आणि त्यांचा हात धरून समुद्रतळाशी चालण्याचा आगळावेगळा अनुभव मिळाला. प्रवाळांचे वेगवेगळे रंग इथेही दिसत होते. आतापर्यंत अबिस किंवा एपिक चित्रपटांत पाहिलेले अद्भुतरम्य शॉट्स आठवत होते. हॅवलॉक आयलंडमध्येच तन्मयने स्कुबा डायव्हिंगचा आणि पॅरासेलिंगचाही अनुभव घेतला. महासागराची ही विलोभनीय दुनिया पाहिल्यानंतर आम्ही राधानगर बीचचं दर्शन घेतलं. बीचच्या आसपास भेळ, कुरमुरे असे चाट पदार्थ विक्रीस होते. भेळवाले 'झालमुडी, झालमुडी' अशी आरोळी ठोकत होते. हा काय प्रकार आहे, विचारल्यावर ते म्हणजे भेळीवर शिंपडायला राईचं तेल होतं. बंगाल, यूपीबिहारच्या पर्यटकांच्या आवडीचं असावं. रिसॉर्टवर परतल्यावर छोटा गायक गोळवणकर, शैला चिखले-खोसला, इंदूरच्या रश्मी केळकर, दमयंती आचरेकर आदींची सुरेल गीते आणि मनमाडचे डॉ. गुजराथी, कुलकर्णी, लिखते यांच्या बहारदार गप्पांनी संध्याकाळ रमणीय झाली.

**अंदमानचा पाऊस, तिथली वखार**

अंदमानमध्ये पाऊस आला की, मुंबईतल्या मान्सूनची पहिली वर्दी आपल्याला मिळते. मुंबईत आजकाल मान्सूनव्यतिरिक्तही पाऊस मध्येच चकित करून जातो. आम्ही मुंबईकर अंदमानला गेल्यामुळे तेच वारं तिथल्या पावसालाही लागलं असावं. त्यामुळे अचानक प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारीला आम्हाला तिथल्या पावसाचं दर्शन घडलं. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला आम्ही शहीद द्वीप तथा नील आयलंडवर क्रूझने पोहोचलो. स्वराज द्वीपपेक्षा हे बेट थोडं वेगळं होतं. इथले रस्ते पोर्ट ब्लेअर आणि स्वराजइतके चांगले नव्हते. रस्त्यांलगत वाळू पसरलेली असायची, कारण सर्व रस्त्यांना किनारा अगदी जवळ होता. आम्ही सर्व देवेन्द्र गंद्रेंच्या नेतृत्त्वाखाली आमच्या हॉटेलवर पोहोचलो. तेव्हा रम्य संध्याकाळी हॉटेल प्रांगणाला खेटूनच असलेल्या सुशांत किनाऱ्यावर चंद्र मंदस्मित करून आपलं समुद्रातलं प्रतिबिंब पाहत होता. लाटांनी ते मध्येच पुसलं जात होतं आणि पुन्हा अवतरत होतं. समुद्राची गाज ऐकतच गप्पांचा फड रंगू लागला आणि रात्रीचं जेवण झाल्यावर लाकडी बांधकामांच्या सुविधाजन्य कुटींमध्ये आम्ही विश्रांत झालो. सूर्योदयाचं दर्शन घेण्यासाठी पहाटे साडे-चारचा गजर लावून पाच वाजता बरेचसे जण खाली आले. देवेन्द्रला बहुधा इथल्या सूर्याच्या लपंडावाची आतली खबर असावी. तो काही

दिसला नाही आणि सूर्याचाही पत्ता लागेना. 'नभ मेघांनी आक्रमिले', असं क्षितिजावरचं दृश्य होतं. वाळूवरची प्रभातफेरी मात्र तजेलदार होती. ती झाल्यावर सर्वजण प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी हिरवळीवर परतले. तिरंग्यासह सर्वजण छायाचित्र काढून घेत होते. राष्ट्रगीताच्या साथीने तिरंगा फडकला आणि ध्वजवंदन झालं. आपल्या अंदमानच्या भूमीत साजरा झालेला हा प्रजासत्ताक दिन यंदा आमच्यासाठी खास ठरला. त्यानंतर आम्ही भरतपूर बीचवर गेलो. तिथे पुन्हा शंख, शिंपले, माळा यांची खरेदी झाली. त्याचवेळी अंदमानच्या अवेळी पावसाने आम्हाला गाठलं आणि चिंब भिजवून टाकलं. तिथला नॅचरल ब्रिज (एका दगडातून नैसर्गिकरीत्या तयार झालेली कमान) आणि त्याखाली प्रवाळ आणि समुद्रीजीवनाचं जवळचं दर्शन घेण्याची सैर आम्हाला या पावसामुळे रहित करावी लागली. अर्थात पावसाची मजाही काही और होती. लहरी हवामानाचा एकदा तरी अनुभव यायलाच हवा. ही नील बेटाची सफर पूर्ण करून सायंकाळी बदलत्या हवामानामुळे हेलकावणाऱ्या क्रूझने आम्ही पुन्हा पोर्ट ब्लेअरला परतलो. ती सहलीतली समारोपाची रजनी होती. त्यामुळे वेगवेगळे गेम्स आणि सहलीतील इतर खेळांमधील बक्षिसांचं वाटप असा कार्यक्रम झाला. अखेरच्या दिवशी प्रत्येकाचे उड्डाणमार्ग वेगवेगळे होते. त्यापूर्वी आम्ही एका बेटावरची 'चातम सॉ मिल' ही लाकडाची प्राचीन वखार बघितली. तिथल्या ओंडक्यांचे आकार हे डोळे दिपवून टाकणारे होते. समुद्रातच लाकडाचे ओंडके टाकून त्यावर खाऱ्या पाण्याची प्रक्रिया करून ते लाकूड टिकाऊ केलं जातं. जपानी सत्तेच्या काळात बांधलेले बंकर आणि त्याकाळी ब्रिटिशांनी टाकलेल्या बॉम्बगोळ्यामुळे पडलेला खड्डाही इथे होता. पडौक हे इथलं एक नंबरचं लाकूड अनेकरंगी पोत असलेलं...त्यापासून तयार केलेल्या विविध वस्तू इथल्या संग्रहालयात मांडल्या होत्या. ओंडक्यांचं प्रत्यक्ष कटिंग सुरू होतं. लाकडाच्या वखारीचं बांधकामही जाडजूड लाकडांच्या खांबांवर बेतलेलं होतं. ही वखार पाहिल्यानंतर आम्ही मानववंशशास्त्र संग्रहालय पाहण्यास गेलो. अंदमानच्या ५७२ बेटांपैकी अवघ्या ३८ बेटांवर वस्ती आहे आणि त्यापैकी काही बेटांवरील आदिवासींचा आधुनिक मानवाशी संपर्कच आलेला नाही. या लोकसंख्येची मोजदाद कशी होते याचा उलगडा चातम सॉ मिलमधल्या संग्राहक ताईने केला होता. हे आदिवासी जगतात कसे, किती प्रकारचे आदिवासी इथे आहेत, याचं दर्शन या मानववंशशास्त्र संग्रहालयात झालं. अंदमानचं हे स्मरणीय वैभव मनांत साठवून आणि काही फोटो, वस्तूंच्या रूपात हातात घेऊन आम्ही मुंबईच्या परतीच्या प्रवासास निघालो. या सात दिवसांच्या टूरमध्ये भारतभूमीचं समुद्रातलं तरंगतं वैभव पाहण्याची संधी मिळाली. आमच्या सहलीत रश्मी केळकर, चांदोरकर, मालंडकर, खांडेकर, गोळवणकर या सर्व मावशींनी आणि इंदौरच्या वाणीदाम्पत्याने आपलं वय झालं असूनही उत्साहाने सर्वत्र भ्रमंतीत सहभाग घेतला. डॉ. गुजराथी दाम्पत्य, डॉ. पहाडे दाम्पत्य, त्र्यंबक व सीमा कुलकर्णी या मनमाडवासियांचा उत्साह जबरदस्त होता. नीरद देशपांडे हा देशपांडे-एकबोटे दाम्पत्यांच्या कुटुंबातला आमच्या सहलीतला सर्वात लहान सदस्य भरपूर बागडत सर्वांचं मनोरंजनही करत होता. धावडे, आचरेकर, मोरजे तसंच नीतिन आणि सीमा लिखते यांचा सहभाग आणि सर्वांना प्रोत्साहित करण्याचा उत्साह भारी होता. सुरुवातीचे दोन दिवस संगीत-संयोजक अप्पा वढावकर, गिटारवादक ज्ञानेश देव यांचाही सहवास आम्हाला लाभला. एकेकाळच्या कोळीगीत क्वीन शैला चिखले-खोसला यांची त्यांच्याशी बऱ्याच वर्षांनी या सहलीत भेट झाली व आमचीही त्यामुळे ओळख झाली. अंदमानात असा विविध ठिकाणांच्या सुहृदांचा मेळा जमला. हे अनुभव तुमच्याशी शेअर करताना पुन्हा ते सारं डोळ्यांपुढे तरळलं.


**– समीर कर्वे**

ज्येष्ठ पत्रकार, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई

'तडजोड' हे आयुष्याचं दुसरं नाव आहे...

# डिजिटल किमानतावाद

*डीप वर्क या दणदणीत खपाच्या पुस्तकानंतर लेखक कॅल न्यूपोर्ट यांचं ताजं पुस्तक म्हणजे 'डिजिटल मिनिमलिझम' हे होय. या पुस्तकाचे पुस्तक परीक्षण लेखक अजिंक्य कुलकर्णी यांनी प्रस्तुत लेखात केले आहे - संपादक*




डीप वर्क या दणदणीत खपाच्या पुस्तकानंतर लेखक कॅल न्यूपोर्ट यांचं ताजं पुस्तक म्हणजे 'डिजिटल मिनिमलिझम' हे होय. डिजिटल क्रांतीनंतर आणि समाज माध्यमांच्या विस्फोटानंतर मानवी एकाग्रतेची कधी नव्हे ती इतकी शकले उडाली आहेत. समाज माध्यमांचे व्यावसायिक प्रारूप हेच मुळात 'दिखावे की दुनिया' यावर आधारित आहे. अशा या काळात उपभोक्तावाद या वादाने जगातील सर्व वादांवर मात केली आहे. समाज माध्यमांवर सतत क्रियाशील असल्याने मी त्यावर नियमितपणे काही ना काही कृती (activity) केलीच पाहिजे हे एक मोठं अनामिक दडपण आपल्यावर पडत असतं. या क्रियाशीलतेचा सेलेब्रिटी वर्ग सोडल्यास इतरांना तसा आर्थिक फायदा काहीच नसतो. मात्र समाज माध्यमांवर वेळ घालवल्यामुळे त्यांचा मात्र चांगलाच आर्थिक फायदा होतो. आता प्रश्न आहे आपला की आपण त्यांच्या जाळ्यात किती अडकायचं? किती वाहत जायचं? फेसबुक मित्रयादीतलं कुणीतरी हॉटेल मध्ये जेवायला गेल्याचे, फिरायला गेल्याचे, ट्रेकिंगला गेल्याचे फोटो टाकतं त्यामुळे आपणही अशा आनंदापासून वंचित रहायला नको म्हणून आपल्यालाही तसं करावं वाटतं. हा जो दबाव समाज माध्यमं आपल्यावर सतत टाकत आहेत या पासून स्वतःचे संरक्षण करायचं कसं? या सर्व प्रश्नांमागचे व्यावसायिक मानसशास्त्र, त्यांचे वास्तव रूप आणि मनाला शतखंडीत होण्यापासून वाचवायचे असेल तर त्यावर काय उपाय करावेत याची चर्चा केली आहे कॅल न्यूपोर्ट यांनी आपल्या पेंग्वीन बिझनेस तर्फे प्रकाशित झालेल्या 'डिजिटल मिनिमलिझम' या पुस्तकात.

तंत्र तत्त्वज्ञ जेरॉन लॅनिअर म्हणतात की, ''समाज माध्यमांचा अतिवापर करत असाल तर व्यक्ती रागीट होण्याची संभावना जास्त असते. तसेच, त्या व्यक्तीच्या रागाचे प्रतिबिंब मग त्याच्या फेसबुक, ट्विटर खात्यावरही दिसू लागतं. समाज माध्यमांची रचनाच अशी आहे की, इथे नकारात्मक भावनेला हवा देणारा मजकूर जास्त पसरवला जातो. त्याचा परिणाम हा आनंद कमी होण्यात, दडपण वाढवण्यात, तुमच्या महत्त्वाच्या गोष्टी पासून तुमचं लक्ष विचलित होण्यात होतो.'' तंत्रज्ञानाच्या आपण इतकं आहारी जात आहोत की, आपण सुखाच्या क्षणांचा आनंद घेणेही विसरत चाललो आहोत! नव्याने जन्माला आलेल्या मुलाला/मुलीला अंघोळ घालण्याचा आनंद लुटण्याऐवजी आम्ही ते मोबाईलमध्ये कैद करण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक गोष्टीचा आम्हाला एकतर फोटो काढायचा असतो किंवा व्हीडिओ तरी तयार करायचा असतो. गोष्टी कॅमेरात कैद करण्यामागे आम्हाला त्या क्षणाचा आनंद घ्यायचा नसून; त्या क्षणांवर आमचा मालकी हक्क प्रस्थापित करायचा असतो.

एच.बी.ओ च्या 'रियल टाईम' या शोचे निवेदक बिल माहेर आपल्या एका शोमध्ये म्हणाले होते की, ''सोशल मीडिया सम्राटांनो! तुम्ही एक चांगलं जग निर्माण करण्याचा जो एक भ्रम निर्माण करत आहात ना तो थांबवा. कारण तुम्ही 'लाईक' नावाची एक तंबाखू विकता आहात ज्याचं मुलांना व्यसन लागतंय.'' ट्रिस्टन हॅरीस हे सिलिकॉन व्हॅली येथील गुगल मधील इंजिनियर. त्यांना अँडरसन कूपर यांनी बोलतं केलं होतं. ही मुलाखत चांगलीच गाजली होती. कूपर यांनी हॅरीस यांन विचारले की, ''सिलिकॉन व्हॅली ॲप्सला प्रोग्राम करतात, की माणसांना प्रोग्राम करतात?'' हॅरीस म्हणतात की, ''ते माणसांनाच प्रोग्रॅम करता. ते दाखवतात की तंत्रज्ञान हे उदासीन तटस्थ असतं. पण असं काही नाहीये. हे आमच्यावर अवलंबून आहे की आम्ही या माहितीच्या वापर कसा करतो. तंत्रज्ञानाचं समाज माध्यमांचं जे व्यसन लागलं आहे तो काही अपघात नाहीये. हे सर्व विचारपूर्वक प्रोग्राम केलेलं आहे.'' आपला मेंदू अशा गोष्टींच्या प्रभावाखाली फार लवकर येतो. आपल्या स्मार्टफोनची रचनाच अशी असते की, तुम्हाला तो वारंवार उघडून पहावा वाटतो. याची खरी सुरुवात झाली ती २००९ साली जेव्हा फेसबुकने सर्वप्रथम 'लाईक' चा पर्याय दिला. फेसबुकने दिलेला हा लाईकचा पर्याय याने फेसबुक वापरकर्त्यांची, तसेच पर्यायाने फेसबुकची सर्व मानसिकताच बदलून टाकली. सीन पार्कर जे फेसबुक मध्ये एका उच्च पदावर कार्यरत होते. २०१७ सालच्या एका कार्यक्रमात ते म्हणाले होते की, ''हे 'लाईक' बटन देण्यामागे ग्राहकांचा कशाप्रकारे जास्तीत जास्त वेळ हा फेसबुक ॲप वापरण्यामध्ये जाईल हा त्यामागील खरा विचार होता. बदल्यात वापरकर्त्याच्या भावना प्रत्येक वेळी चाळवल्या पाहिजे. त्यांना प्रतिसाद दिला गेला पाहिजे.''

नवनवीन तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या या मोठमोठ्या प्रश्नांवर छोटे छोटे उपाय करून चालणार नाहीये. गतीने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी मुकाबला करायचा असेल तर आपल्याला बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या पलीकडे पाहायला हवं. त्यासाठी आपल्या आत खोलवर रुजवलेल्या मूल्यांचा पाया म्हणून वापर करता येईल. सुरुवातीपासूनच तंत्रज्ञानाशी एका वेगळ्या पद्धतीने जोडून घेतलं पाहिजे. मग प्रश्न पडतो की, 'डिजिटल किमानतावाद' म्हणजे काय? डिजिटल किमानतावाद म्हणजे तंत्रज्ञान वापरण्याचे एक असे तत्त्वज्ञान ज्यामध्ये आपण आपला ऑनलाइन वेळ हा काळजीपूर्वक निवडलेल्या गोष्टींसाठी खर्च करतो. आपल्या आत खोलवर रुजलेल्या मूल्यांशी अनुकूल असलेल्या गोष्टींना प्राधान्य देतात तर, इतर सर्व गोष्टींवर आनंदाने तुळशीपत्र ठेवतात. समाज माध्यमांवर क्रियाशील असलेल्यांना वाटतं की, समाज माध्यमं वापरायची आपण बंद केली तर आपण बऱ्याच गोष्टींपासून वंचित राहू, इतरांच्या मानाने आपण खूप माग पडू की काय अशी भीती वाटते त्यांना! डिजिटल किमानतावादींना मात्र याची फिकीर नसते. ते या माध्यमावरील कमअस्सल गोष्टींवर वेळ खर्च करत नाही; ना या गोष्टींचा आपल्यावर प्रभाव पडू देतात. समाज माध्यमं वापरकर्त्यांसमोर ती माध्यमं वापरायचे सोडून देण्याची कोणतीही ठोस कारणे नसतात. न्यूपोर्ट डिजिटल किमानतावादाची तीन तत्त्वे सांगतात. १) किमानतावादींना चटकन लक्षात येतं की, त्यांचा वेळ मोबाईल मधील खूप सगळ्या ॲप्स, साधनं (डिव्हाइस) आणि सेवा घेण्यात जातोय आणि याचा आपल्या मनावर नकारात्मक परिणाम होतो आहे. छोट्याशा फायद्यासाठी ही इतकी मोठी किंमत मोजणे योग्य नाही. २) किमानतावादींना हे पक्क समजतं की, त्यांच्या मूल्यांशी अनुकूल तंत्रज्ञान कोणतं, ते कसं वापरायचं असतं? ३) किमानतावादी हे त्यांची बांधिलकी असलेल्या गोष्टींसोबत समाधानी असतात. मुळात समाधानाच्या स्रोताचा उगमच त्यांच्या बांधिलकीत असतो.

समाज माध्यमं जन्माला येऊन आत्ताशी कुठे एक तप उलटलंय. म्हणजे अजून हे तंत्रज्ञान तसं नवीनच आहे. त्यामुळे त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन हा

मनोरंजनाचे एक साधन म्हणून पाहण्याइतकाच आहे. फेसबुकच्या घोषवाक्यामध्येच म्हटलं आहे की, 'लोकांना अशी शक्ती प्रदान करा की, ते त्यांचा असा एक लोकसमूह उभा करू शकतील आणि जग जवळ येईल.' वरवर पाहता हे घोषवाक्य विधायक वाटतं, पण नक्की कोणत्या मार्गाने फेसबुक किंवा इतर माध्यमं हे ध्येय साकार करणार आहेत? तसेच काय किंमत मोजून? समाज माध्यमांच्या आहारी जाऊ नये म्हणून न्यूपोर्ट पुस्तकात काही उपाय सुचवतात. १) स्वतःला कमीत कमी तीस दिवसांसाठी समाज माध्यमांपासून दूर ठेवा. २) या तीस दिवसांत ऑनलाईन गोष्टी सोडून तुम्हाला ज्या ज्या गोष्टींनी आनंद मिळतो त्या त्या करा. उदाहरणार्थ वाचन, एखादं वाद्य शिकणे, मित्रांसोबत फिरायला जाणे इ. ३) समाज माध्यम कसे वापरायचे या संदर्भातले आपले स्वतःचे असे नियम ठरवा. कामातून सुट्टी घेण्याचेही काही फायदे असतात. त्यामुळे परिस्थितीकडे आपण एका वेगळ्या नजरेने, तटस्थपणे पाहू शकतो. अमेरिकन गृहयुद्धाच्या दरम्यान अब्राहम लिंकन म्हणूनच व्हाईट हाऊस मधून काही दिवस बाहेर पडत व एका जवळच्या निसर्गरम्य ठिकाणी त्यांनी एक साधीशी झोपडी बांधून घेतली होती त्यात ते राहात. या सुट्टीमुळे लिंकन गृहयुद्धाच्या अति ताणावर मात करू शकले. गृहयुद्ध संपल्यानंतर वर्तमानपत्रांनी या सुट्टीचा 'देशाची फाळणी वाचवणारी सुट्टी' म्हणून गौरव केला होता. समाज माध्यमांचे ॲप मोबाईल मध्ये न वापरता त्यांच्या संकेतस्थळावर जाऊन मगच आपलं खातं वापरावं. यामुळे समाज माध्यमांचे येणारे सारखे सारखे नोटिफिकेशन बंद होतात. त्यात आपण गुरफटले जात नाही.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात न्यूपोर्ट आपल्याला मनाच्या शतखंडीत करणाऱ्या समाज माध्यमांपासून एकटे राहण्यासाठी काही कृती सांगतात. जसे की, गदारोळापासून दूर जात अमेरिकन तत्त्वज्ञ हेन्री थोरो याने वॉल्डन काठी एकटे राहणे पसंत केले. पण असं करणं प्रत्येकाला शक्य होईलच असं नाही. म्हणून न्यूपोर्ट म्हणतात की, 'एकटं राहणं म्हणजे एकाकी राहणं असं नव्हे, तर आपल्या मूल्यांना धरून आपल्या विचारात एकटं राहणं होय.' शाळांमधून मुलांची मैत्री अतिशय पातळ होत चालली आहे. त्यांना समाज-माध्यमांवर हजारो मित्र असतात; पण प्रत्यक्ष आयुष्यात मात्र एक भावनिक पोकळी जाणवते. अमेरिकन समाज-मानसशास्त्रज्ञ व शैक्षणिक सल्लागार डॉ. शेरी टर्केल या म्हणतात की, 'आजकालची मुलं ही निष्ठुर अशी नाहीत. परंतु, त्यांना संवादाची आवश्यकताच भासत नाही. त्यांना इतरांच्या भावना समजून घेता येत नाहीत. मुलांमध्ये सम-भावना (एँपॅथी) नाहीशी होत चालली आहे.' हातात मोबाईल असताना माणसं बोलण्याऐवजी टंकलिखित संदेश का पाठवतात? टर्केल म्हणतात की, 'संदेशामुळे दोन व्यक्तीत सुखावह अंतर राहतं. यामुळे इतर माणसांचा संपर्क नकोसा झाला आहे. संवादापेक्षा टंकलिखित संदेश सोपा व सुरक्षित वाटू लागला आहे. फोनवर प्रत्यक्ष आणि स्वयंस्फूर्त बोलावं लागतं, हे टाळण्याकडे तरूणांचा कल वाढला आहे. संवादापासून पळणारे हे तरुण एकमेकांशी संदेश वाहनातून 'संवाद' साधतात. समाज माध्यमांद्वारे ह्या तरुणांचं बोलून झाल्यावर त्यांना हा प्रश्न पडतो की, आपण संभाषण तर बराच वेळ केलं पण तो 'संवाद' होता का?' संवादामधील आत्मीयता घटून वाढत चाललेल्या रुक्षतेची ही परिणीती आहे!

डिजिटल मिनिमलिझम लेखक : कॅल न्यूपोर्ट
प्रकाशक : पेग्वींन
बिझनेस पृष्ठे : २५० किंमत : ५९९

**– अजिंक्य रमेश कुलकर्णी**
मु/पो – अस्तगांव, ता – राहाता
जी – अहमदनगर, पिन – ४२३१०७
मो : ९४०३१८६११९

●●●

# मनाला भावणारी कसदार कविता.....

*शिवानी गोखले यांचा 'वाट माझीया घराची..' या कवितासंग्रहाचे पुस्तक परीक्षण ज्येष्ठ साहित्यिक व साहित्य अकादमी दिल्लीचे माननीय सदस्य प्रा.डॉ. नरेंद्र पाठक यांनी प्रस्तुत लेखात केलं आहे - संपादक*

'उदंड जाहल्या कविता... अन् कविता संग्रह' अशा वातावरणात कसदार कविता वाचायला मिळणं तसं दुर्मीळच. अशा कवितामय वातावरणात शिवानी गोखले यांचा 'वाट माझीया घराची..' हा कवितासंग्रह हाती लागला. वाचला. खूप दिवसांनी कसदार कविता अनुभवण्याचे समाधान लाभले. इंद्रधनुष्याचे जसे सप्तरंगी आविष्कार असतात तशीच विविधता आणि भावनाविष्कार या एकाच कवितासंग्रहात सामावलेले आहेत. भावकविता, प्रेम कविता, निसर्ग, भक्ती, अध्यात्म, गूढता, समर्पण अशा विविध भावाविष्कारांचा कविता संग्रह म्हणजे शिवानी गोखले यांचा,- 'वाट माझीया घराची' हा नुकताच प्रकाशित झालेला कवितासंग्रह. या शिवाय महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या कविता मात्रा, वृत्त, छंद, अलंकार याचं गणित आणि तंत्र सांभाळणाऱ्या कविता आहेत. अलीकडे बहुतांश कवी सहज आणि मुक्तछंदात लिहीत असताना, कवितेचं आणि भाषेचं व्याकरण याकडे काहीसं दुर्लक्ष होत असताना, शिवानी मुक्तछंदाबरोबरच अष्टाक्षरी, अक्षरछंद, अक्षरगणवृत्त, अभंग, मात्रावृत्त, अशा रचना लिलया हाताळतात. या बाबतीत त्यांचं अध्ययन आणि अभ्यास असल्याचे, कविता वाचताना ठिकठिकाणी जाणवतं. मुळातच त्यांना प्रतिभेचे देणं आहे. त्यांना कविता लिहावी लागत नाही; तर त्यांच्या झरणीतच कविता आहे. आपल्या स्वतःच्या कवितेबद्दल व्यक्त होताना कवयित्री तसं सांगतात आणि त्यांची कविता त्यांच्याशी संवाद साधते त्याविषयी त्या लिहित्या होतात....

तू थांब जराशी आता
ये माझ्यापाशी बैस
मी तुझ्यात आहे वेडे
घे जाणूनी माझा पैस,

मी झराच आहे वेडे
तुजला का उमजत नाही !
घे झरणी हातामध्ये
मी कुठेच थांबत नाही ...

प्रेम कविता हा तसा अगदी नेहमीचा विषय. 'कवी आणि प्रेम कविता' हे युगांयुगाचे समीकरण. काही वेळा प्रेम कवितांमध्ये सवंगता आणि उथळपणा दिसून येतो. मात्र शिवानी गोखले यांच्या प्रेम कविता त्या पलीकडे जातात आणि प्रेमातील नाजूकता, संयम, अस्वस्थता, सौंदर्य, समर्पण, अद्वैत या सगळ्या बाबत खूप सुंदर भाष्य करतात. या कविता भावगर्भ तर आहेतच, पण त्या विशिष्ट मीटर मध्ये आहेत. मोजून मापून आणि विचारपूर्वक शब्दांचा वापर, यामुळे त्यांच्या प्रेम कवितांची 'प्रेमगीतं' होतात. वाचल्यानंतर त्यांच्या कवितांचे शब्द पुन्हा पुन्हा मनात घोळत राहतात. कवितेला ताल, नाद, ठेका, मीटर असल्यामुळे ती कविता दीर्घकाळ आपल्या भोवती रुंजी घालते. आपण ती कविता गुणगुणत राहतो.

''पुन्हा आठवांचा सुरू खेळ होतो, पुन्हा तोच चाळा बरा वाटतो

जरी जाणते भास आहे तुझा हा, मला तेवढा रे खरा वाटतो ..''

किंवा

''ऋतू आज माळून गेले नदीशी, तुझी ओढली शाल, गोंजारली

कशी रातराणी तुझे श्वास झाली, मला वेढूनी गोड गंधाळली

सख्या यौवनाचा नको भार आता, उगा कैफही पिंजरा वाटतो....''

कवितांच्या अशा ओळी वाचकांच्या मनाचा ठाव घेतात आणि वाचकाला त्या कविता, त्या भावना, तो अनुभव आपलासा वाटतो. ही कवितेची ताकद आहे. या प्रेमाविष्कारासाठी त्यांनी खूप सुंदर शब्द वापरला आहे, तो म्हणजे 'खडीसाखरी कारणे'. त्यात प्रेमाचा गोडवा, आतुरता आणि हवेहवेसेपणातली ओढ आहे.

या कवितासंग्रहात त्या केवळ प्रेमाविष्कारावर थांबत नाहीत, तर पुढे जाऊन युगानुयुगाच्या राधा कृष्णाच्या प्रेमातील अद्वैत आणि समर्पण यावरही खूप सुंदर भाष्य त्या करतात. अगदी कमीत कमी शब्दांत राधाकृष्णाचं अद्वैत सांगताना त्या लिहितात,-

श्रीरंगाचे दोन भाग हे
राधे आधी, राधे नंतर
पावा होता, सुटला पावा
इतुके त्याने पडले अंतर

किंवा

वेडी आशा खुळी याचना
कान्हा कधी का संपत नाही
संपून जाता राधा अवघी
वृंदावनि परतुन उगवावे

किंवा

राधा मग कान्हा झाली
तो तिच्यात हरवून गेला
का कृष्णडोह तो निळसर
राधेला घेऊन गेला ....

राधा कृष्णाचे नेहमीचे तेच ते बहुचर्चित प्राचीन प्रेम, पण त्या मध्ये त्यांनी नवता शोधून, राधाकृष्ण चरित्रातील त्यांना जाणवलेल्या आणि भावलेल्या रिकाम्या जागा आपल्या प्रतिभेने आणि शब्दाविष्काराने भरून काढलेल्या आहेत.

अद्वैत आणि समर्पणातील भक्तीरंगही त्यांच्या कवितेतून प्रकटतो. देहापासूनचा सुरू झालेला प्रवास परमतत्त्वापर्यंत येऊन पोहोचतो हे सांगताना त्या आपल्या कवितेतून लिहितात ---

एक भाव देह भाव
झाकोळला आत्मभाव
विठू आतून कुडीच्या
कसं उजेडाला न्यावं?

मागे उरे एक सत्त्व
देह परमाचे तत्त्व
तूच माया, तूच ब्रह्म
तूत वसते देवत्व....

कवयित्रीने कवितेतून विठ्ठलाशी, पांडुरंगाशी केलेला संवाद विठ्ठलभक्तांची श्रद्धा, विश्वास, अधिकार आणि एकरूपत्व सांगून जातो. शिवानी गोखले यांच्या विठ्ठल भक्तीच्या कविता वाचताना ---

'माझ्यासाठी पांडुरंगा, तुझं गीता भागवत, पाण्यामधी समावतं, मातीमध्ये उगवतं...'

या बहिणाबाईंच्या कवितेची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. सगुण, निर्गुण, साकार-निराकाराची कल्पना सहज, सोप्या आशयघन शैलीतून

---

तुम्हाला हवे होते, पण मिळाले नाही म्हणून निराश होऊ नका; कदाचित त्याने तुमचे चांगले होणार नसेल!..

त्यांच्या कवितेतून प्रतिबिंबित होते. त्यांची गूढ कविता समजायला, उमगायला जरा कठीण असली तरी त्या कवितेचं शब्द सामर्थ्य वेगळचं आहे. प्रतिमा, प्रतिकं, वर्णन मनाला भावते. या कविता संग्रहात अनेक कवितांमधून त्यांनी योजलेले शब्द लालित्यपूर्ण असं सूचन करतात. ठिकठिकाणी त्यांनी पेरलेले काही शब्द त्यांच्या प्रतिभेचा विशेष आविष्कार आहेत. उदाहरणार्थ– चांदणमाळा, चांदणभाषा, चांदणंगारा, चांदनस्पर्श, काजळ रंग, मत्त केवडा, केशवचाहुल वारा.... असे अनेक शब्द आपलं लक्ष वेधून घेतात.

एकूणच, 'वाट माझीया घराची ...' हा शिवानी गोखले यांचा कवितासंग्रह मराठी साहित्यात आणि कवितेच्या प्रांतात एक आश्वासक पाउल आहे .अलीकडे तंत्रज्ञान विकसित होत आहे. ए.आय. म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचं आव्हान समोर उभं आहे. प्रतिभेचे आणि बुद्धिमत्तेचं काय होणार? असे प्रश्न उपस्थित होत असताना, मूळ संवेदना, मूळ भावना आणि त्यातून स्व–बळाच्या प्रतिभा साधनेतून जन्माला आलेली कविता हीच खरी कसदार कविता असते, हे या कविता संग्रहाने अधोरेखित केलेलं आहे. तुका म्हणे झरा– आहे मुळीचा ची खरा ..... हेच सत्य.

शिवानी गोखले या कवयित्री आहेत. एकांकिका लेखन त्यांनी केलेलं आहे, दूरदर्शन मालिकांसाठी शीर्षक गीत लेखन त्या करतात, रंगमंचावर अभिनेत्री म्हणूनही त्या वावरतात आणि अशी विविधांगी आशयघन काव्य निर्मिती करतात, म्हणून खरंतर त्यांचं नावं 'विविधा गोखले' असंच असायला हवं. त्यांच्या या पहिल्या कवितासंग्रहास मनःपूर्वक शुभेच्छा.

**– प्रा. डॉ. नरेंद्र पाठक, ठाणे**
९१६७ ४०६०५०

•••

(पृष्ठ क्र.८ वरून – **ज्ञान व ज्ञान संपादन**)

२४ गुरू होते – पृथ्वी, ग्रह, वायू, कोळी (जाळे विणून कीटक पकडणारा), वगैरे वगैरे. खरा गुरू सर्वव्यापी मानला जातो – सर्वव्यापी निसर्गाप्रमाणे. कॅथलिक धर्मात अनेक ऐतिहासिक अत्याचार घडले आहेत, त्यापैकी एक असा; इटालियन तत्त्वज्ञ, खगोलशास्त्रज्ञ व गणिततज्ञ जिओर्डानो ब्रुनो यांना पोप क्लेमेंट (आठवा) याच्या आदेशाने १७ फेब्रुवारी १६०० रोजी धर्मद्रोहाच्या आरोपाखाली मृत्यूची शिक्षा देण्यात आली. याचे कारण असे की, ब्रुनो म्हणाला होता की, 'देवाचे वास्तव्य निसर्गात आहे!' गहन ज्ञानप्राप्ती केल्यावर स्वत:चे विचार प्रकट करण्याबद्दल ब्रूनोला असे घोर आत्मदान करावे लागले!

तात्पर्य असे की, ज्ञान हे मुक्ती देणारे आहे व सकल जीवनासाठी आवश्यक अशी शक्ती देणारे आहे. जगाच्या प्रगतीसाठी सत्यशोधक महात्म्यांनी मन:पूर्वक अभ्यास करून शुद्ध ज्ञान मिळवले व त्यातून उपजलेल्या अंत:प्रेरणेने मानवजातीला क्रमशील केले. अन्यथा जग तुंबलेल्या डबक्याप्रमाणे राहिले असते. अशी माणसे वा युगपुरुष दुर्मीळ असतात आणि ते वारंवार जन्माला येत नाहीत. तरीसुद्धा त्यांच्या शिकवणीने प्रेरित झालेले सद्गुरू पृथ्वीवर अवतरतात व विचारशील मानवांना त्यांच्या जीवनाला आवश्यक अशा ज्ञानप्राप्तीसाठी योग्य मार्ग दाखवून जातात. उदाहरणार्थ, बापूश्री–निर्मित 'सहज योग'.

**– डॉ. सतीश देसाई**
लंडन

•••

# चतुरस्र प्रतिभेचा रसाळ कवी - वैभव जोशी

*महाराष्ट्रातील आघाडीचे गझलकार व प्रख्यात कवी वैभव जोशी यांच्यावर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*

...... खरं तर सोपं लिहिणं अवघड असतं आणि अवघड लिहिणं सोपं असतं. आशयघन आणि सोपे शब्द असं मिश्रण फार कमी साहित्यिकांना जमतं. अशा प्रतिभावंत साहित्यकारांमध्ये वैभव जोशी यांचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो.

ज्यांच्या अमोघ वाणीने अखिल साहित्यविश्वाला आपलंसं केलं होतं, ते प्राचार्य राम शेवाळकर. साहित्यरचनांविषयी परभणी येथील एका व्याख्यानात म्हणाले होते की, 'माणसाची अभिरुची ही उन्नत होत असते. आणि एकदा अभिरुची उन्नत झाली की, कालच्या अभिरुचीला साजेसं आज आवडत नाही. कारण आजची अभिरुची उन्नत झालेली असते आणि आज अजून छान असं काहीतरी आपल्याला आवडत असतं.' मला स्वत:ला ते तंतोतंत पटलेलं आहे. मी जेव्हा एक रसिक म्हणून स्वत:चं आत्मपरीक्षण करतो, त्यावेळी मला ही गोष्ट लागू पडल्याचेही जाणवते. म्हणून एखादी साहित्यकृती वाचली आणि ती मला आवडली, असं प्रत्येकवेळी घडतंच असं नाही.

कवी वैभव जोशी यांच्या रचना मला आवडल्या. त्यांनी माझ्या मनाचा ठाव घेतला. मी त्यांच्या साहित्यकृतींच्या आस्वादाकडे कसा वळालो याची गम्मत थोडक्यात सांगतो.

एक दिवस यूट्युबवर आपोआप कवी वैभव जोशी यांची मुलाखत समोर आली. मी सहज क्लिक केलं. थोडसं forward केलं. आणि 'भावनांचा मांडला बाजार नाही, शब्द माझा एवढा लाचार नाही' अशा आशयाच्या ओळी ते सांगत होते. त्यांची एक कवी म्हणून ही भूमिका मला आवडली. अनेकदा काही कवींकडे प्रतिभा असते, पण केवळ वेदना आणि वेदनाच व्यक्त करीत राहिल्यामुळे माझ्यातल्या रसिकाला ते तेवढं पटत नाही. मात्र कवी वैभव जोशी यांची भूमिका ही माझ्या मनोभूमिकेशी साधर्म्य असणारी होती. मी ती मुलाखत पूर्ण पाहिली. त्या मुलाखतीत वैभव जोशींची अजून एक गोष्ट आवडली, ती म्हणजे त्यांचा प्रामाणिकपणा. ते या क्षेत्राकडे कसे वळाले, त्यांनी कोणकोणत्या कवींच्या कविता वाचल्या इत्यादी बाबी अगदी सहज आणि हातचं काही राखून न ठेवता त्यांनी सांगितल्या.

त्या नंतर त्यांची गीतं आणि दत्तप्रसादजींचं सादरीकरण अनेकदा ऐकलं, ऐकतो. शेवटी शेवटी, खूप आल्या सरी किंवा असणेही नश्वर येथे, नसणेही अक्षय नाही या ओळींनी मनात रुंजी घालायला सुरुवात केली. अर्थातच दुसऱ्या दिवशी 'काळ सरकत राहिला' आणलं.

खूप सुंदर अशा रचना या पुस्तकात आहेत. कवीचं प्रतिभावैभव पाहून थक्क व्हावं, अशा या रचना आहेत.

जगातील सर्वच कवींबद्दल आदर व्यक्त करून कवी वैभव जोशी यांच्या विषयी माझी निरीक्षणे मी नोंदवीत आहे.

**निरीक्षण आणि कल्पनाशक्ती :**

उत्तम कवी सभोवतालच्या जगाचे सूक्ष्म निरीक्षण करत असतो आणि त्यांच्या कल्पनाशक्तीचा उपयोग

त्या निरीक्षणांवरून नवीन आणि अद्वितीय कल्पना निर्माण करण्यासाठी करतात. याचे उदाहरण म्हणजे 'वगैरे वगैरे' ही कविता होय.

**भाषा आणि शब्दांवर प्रभुत्व :**

वैभव जोशी यांचं भाषा आणि शब्दांवर प्रभुत्व आहे. ते शब्दांचा वापर अशा प्रकारे करतात ज्यामुळे अर्थ, भावना यांचं नेमकं आणि विलक्षण सुंदर असं आविष्करण होतं.

'उरातील काटे जपावे उराशी, दवांतून का भळभळावे फुलांनी ।' अशा कितीतरी काव्यपंक्ती वरील वर्णन अधोरेखित करतात.

**तंत्रांवर प्रभुत्व :**

वैभव जोशी यांची विविध तंत्रांमध्ये कविता लिहिण्याची क्षमता अफाट आहे. छंद, अलंकार, प्रतिमा आणि इतर साहित्यिक साधनांचा प्रभावीपणे आणि नेमकेपणाने वापर त्यांनी केल्याचं दिसून येतं. गझल रचना असल्यामुळे वृत्त, यमक या गोष्टी तर स्वाभाविक आहेत. विशेषत: रूपक, उत्प्रेक्षा अशा अलंकारांचा एक 'निर्व्याज' साज त्यांच्या कवितेला आहे.

**मौलिकता :**

वृत्त, यमक हे नियम पाळत असताना काही वेळा कविता आपली मौलिकता हरवण्याची शक्यता असते. पण वैभव जोशींच्या बाबतीत असं झालेलं नाही. काव्याचं मौलिकपण त्यांच्या कवितेनं जपलं आहे.

'मी कुठे म्हणतो मला दे, अढळपद गगनातले'

'माणसांच्या काळजातच स्थान दे रे ईश्वरा ।।'

अशा पंक्ती आपल्याला या मौलिकतेची साक्ष देतात.

**व्यंग्यार्थ :**

कवितेचा अर्थ केवळ अभिधा शक्तीयुक्त असेल, तर संस्कृत काव्यशास्त्रज्ञ अशा काव्याला प्राधान्य देत नाहीत. कविता अर्थ कळण्यास सुलभ असावी, मात्र व्यंजनाशक्तीयुक्त असा तिचा अर्थाचा पिसारा असला पाहिजे. वैभव जोशी यांच्या कवितेत अनेक ठिकाणी हा व्यंग्यार्थ फार सुंदर रीतीने व्यक्त झाला आहे. या बाबतीत 'आभाळभर' या कवितेचा आवर्जून उल्लेख करावा वाटतो.

**भाषा शैली :**

वैभव जोशी यांच्या कवितेत सहसा सोपे, सुलभ शब्द आहेत. ऐकण्यास किंवा उच्चारण करण्यास अवघड असे शब्द सहसा नाहीत. सोप्या सोप्या शब्दांमधून सुद्धा रसिकांना विचार करायला लावणारे असे अर्थ ते अभिव्यक्त करतात. 'चेहरा' ही कविता याचेच एक उदाहरण म्हणता येईल.

**उत्स्फूर्तता :**

''Poetry is the spontaneous overflow of powerful feelings: it takes its origins from emotion recollected in tranquillity. - William Wordsworth'' ही कवितेची व्याख्या बहुमान्य आहे. उत्स्फूर्तता असेल तर त्या कवितेत सहजता असते. अशी 'सहजता' वैभव जोशींच्या कवितेत आहे. कुठेही ओढून ताणून कविता पूर्ण केली आहे, असे वाटत नाही. कविता सुचतानाच त्यांना meter मध्ये सुचत असावी, असे वाटते.

**रसवत्ता :**

'वाक्यं रसात्मकं काव्यम् ।' अर्थात रसात्मक वाक्य म्हणजे काव्य, अशी काव्याची व्याख्या साहित्यदर्पणकार 'आचार्य विश्वनाथ' यांनी सांगितली आहे. या अर्थाने वैभव जोशी यांची कविता रस-परिपुष्ट

अशी आहे. शृंगार रस हा जणू त्यांच्या कवितेचा प्रधान रस आहे. अर्थात संयोग आणि विप्रलंभ म्हणजे वियोग असे दोनही शृंगार त्यांच्या कवितेत आढळून येतात. त्यांची अनेक उदाहरणे देणं शक्य आहे. पण रसिकांनी प्रस्तुत गझलसंग्रह पूर्ण वाचावा, म्हणून ही उदाहरणे इथे देत नाही.

खरं तर अजून खूप काही लिहिणं शक्य आहे. पण विस्तारभयास्तव तूर्तास एवढेच! मी व्यक्तिशः कवी श्री. वैभव जोशी यांना ओळखत नाही. मात्र कवीची खरी ओळख ही त्याची कविता असते. रसिकांनी आपल्या मनाचा ठाव घेणाऱ्या कवितांच्या विषयी लिहिलं पाहिजे, या भूमिकेतून मी लिहिलं आहे. माझ्या लेखनात संस्कृतप्रचुर शब्दांचा समावेश असण्याची शक्यता आहे, तेवढं आपण समजून घ्यालच!

कवी श्री. वैभव जोशी यांना रसिकमनाचा ठाव घेणाऱ्या सहस्रावधी रचना त्यांच्याकडून घडून याव्यात, यासाठी अनेक अनेक शुभेच्छा!

काळ सरकत राहिला... / वैभव जोशी/ रसिक आंतरभारती

**– डॉ. चंद्रहास शास्त्री**
परभणी
cdstcebedgmail.com

•••

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

(पृष्ठ क्र.१० वरून – **संगीतायन नांदी – भाग ३**)

स्वरमय नांदी आज गायली नाही तरी नांदी गायनामागची धार्मिक, प्रेरक भावना आजही जिवंत आहे. निसर्ग चक्र फिरत असतं. कालबाह्य घटना पुन्हा नवीन रूप घेऊन समोर येतात. आम्हा सर्व नाट्यवेड्या संगीत रसिकांना आशा आहे की, हीच नांदी उद्या एखाद्या नवीन प्रतिभा संपन्न नाटककाराचा, संगीतकाराचा परिसस्पर्श लाभून नव्या तेजानं अवतीर्ण होईल.

मंडळी, नाटकाची सुरुवात नांदीने आणि शेवट भारत वाक्याने अशी प्रथा आहे. त्यामुळे गोविंद बल्लाळ देवलांच्या 'संगीत मृच्छकटिक' नाटकातील भरत वाक्याने 'संगीतायन' सदरा मधील नांदी या विषयावरील तिसऱ्या आणि शेवटच्या भागाची समाप्ती करू. याचे शब्द आहेत.

''धेनु पायोदा असोत, वसुधा तृणधान्य देवो ।
सुखद पवन तो नित्य सुटोनी, वृष्टि समयी होवो ।।

धर्मनिष्ठ रणशूर भूप ते, खलरिपू दंडोनी करोत,
वसुमतिचे परिपालन, रात्रंदिन जपुनी ।।

निजकर्मी रत असोत जनही नीतिपथा धरुनी ।।
नाट्य कलाही सकल कलांसह पूर्णत्वा येवो ।।''

(समाप्त)

**– डॉ. कीर्ती आगाशे**
विभाग प्रमुख – इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स
विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

•••



नवं काहीतरी शिकण्यासाठी मिळालेला वेळ म्हणजे 'सुट्टी'.

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**Spell Bee परीक्षेचा निकाल**

**स्तर – चौथा (आंतरराष्ट्रीय स्तर)**

आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या Spell Bee परीक्षेत भरघोस यश मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

११ विद्यार्थ्यांनी संपादन श्रेणी प्राप्त केली आहे.

Spell Bee परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे–

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. अनुश्री अक्षय बापये | १ली | ९९ |
| २ | कु. स्वरांग न. वीरकर | १ली | ९३ |
| ३ | कु. अनन्या म. पाटकर | १ली | ९२ |
| ४ | कु. सौमिल शैलेश वाडेकर | २री | ९३ |
| ५ | कु. आयुर जयवंत औटी | २री | ९२ |
| ६ | कु. मेहेक म. शितूत | २री | ९२ |
| ७ | कु. नीरजा स्वप्निल निर्गुण | २री | ९१ |
| ८ | कु. अन्वी अमित कामत | ३री | ९४ |
| ९ | कु. युक्ता धीरज झगडे | ४थी | ९८ |
| १० | कु. सान्वी कार्तिक मूडबिद्री | ४थी | ९८ |
| ११ | कु. स्वानंद स्वप्निल बेलोसे | ४थी | ९२.५ |

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**डॉ होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचा अंतिम निकाल.**



**रौप्य पदक पटकावणारे विद्यार्थी**

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|
| ६क | कुमार नचिकेत चैतन्य जोगळेकर |
| ६अ | कुमारी जान्हवी समीर सोमण |
| ६अ | कुमारी इशा अजित गोरे |
| ९अ | कुमारी आर्य निरंजन वैशंपायन |
| ९क | कुमारी आस्था अजय वाड्याळकर |

**युनिफाईड इंटरनॅशनल इंग्लिश ऑलंम्पियाड परीक्षेचा निकाल (ऑनलाईन )२०२३–२४**



| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | राष्ट्रीय क्रमांक |
|---|---|---|
| ७ | स्नेहा दादासाहेब पाटील | ११३ |
| ८ | मैत्रेयी सुयोग गांगल | ७७ |

**टिळक विद्यापीठ परीक्षेचा निकाल**

**सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे**

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| ५ | दाते आर्या अभिजीत | ९०/१०० |
| ६ | होसिंग वैभवी सुमेध | ९२/१०० |
| ७ | रणदिवे राधिका उमेश | ८५/१०० |

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**दीक्षांत समारंभ**

४ एप्रिल २०२४, गुरुवार डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड स्टडीजच्या पाणिनी सभागृहात २०२२-२३ च्या बॅचचा दीक्षांत पदवी वितरण सोहळा आणि एलएलबीच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

संध्याकाळी ५.३० वाजता पाहुण्यांचे आगमन झाले आणि त्यांना तृतीय वर्षाचे शैलेश लाटकर आणि अक्षय राऊत या विद्यार्थ्यांनी स्टेजपर्यंत नेले आणि काही विद्यार्थ्यांनी लेझिम सादरीकरणाने त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात श्री. विवेक पाटील यांनी त्यांच्या सुरेल आवाजात गायलेल्या सरस्वती वंदनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. समता जोशी आणि प्रा. यशश्री कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या स्वागत भाषणाने झाली. पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

सन्माननीय अतिथींच्या सत्कारानंतर, डॉ. व्ही. व्ही. बेडेकर, अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ आणि श्री ईश्वर सूर्यवंशी, मानद सदस्य सचिव, डीएलएसए ठाणे यांनी विद्यार्थ्यांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर श्री. एस. बी. अग्रवाल, माननीय जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांनी एलएलबी पदवीधारकांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रा. विनोद वाघ, प्रा. हेतल मिशेरी, प्रा. बिसेन, प्रा. अंबर जोशी, ग्रंथपाल शीतल सोनावणे आणि व्हीपीएम टीएमसी विधी महाविद्यालयाचे सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी या समारंभासाठी उपस्थित होते.

त्यानंतर वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण सुरू झाले. पारितोषिक विजेते पुढीलप्रमाणे होते:-

**प्रथम वर्ष**

१. प्रथम पारितोषिक - कु. चव्हाण अंकिता अनिल

२. द्वितीय पारितोषिक - कु. चौबे अंजली वीरेंद्र

३. तृतीय पारितोषिक - कु. शेट्टी भव्यश्री बालकृष्णा

**दुसरे वर्ष**

१. प्रथम पारितोषिक - कु. दुबे रिंकी अर्जुन

२. द्वितीय पारितोषिक - कु. चौबेरीश्वी वीरेंद्र

३. तिसरा पुरस्कार - श्री. जनमांची रामुलु वेंकटराजम

**तिसरे वर्ष**

१. प्रथम पारितोषिक - कु. आचार्य प्रियंका मिलिंद

२. द्वितीय पारितोषिक - कु. आचार्य भाग्यश्री मिलिंद

३. तिसरा पुरस्कार - कु. बहेलिया नेहा अशोक

दीक्षांत समारंभात १२८ विद्यार्थ्यांना पदवीचे वितरण करण्यात आले. प्रा. हेतल मिशेरी यांनी समारंभ यशस्वीपणे

पार पाडण्यासाठी प्रशासकीय कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



**१३ एप्रिल रोजी जितेंद्र चव्हाण कॉलेज ऑफ लॉ (JCCL) स्पर्धा : लॉ ट्रिस्ट' २४ विद्यार्थ्यांनी जिंकली पारितोषिके –**

१. **ग्राहक समुपदेशन स्पर्धा : विजेते संघ** श्री. व्यंकटेश अय्यर (प्रथम विधी वर्ष) आणि निरंजन देशपांडे (द्वितीय विधी वर्ष)

२. **ॲड मॉड स्पर्धा : उपविजेते संघ** श्री. व्यंकटेश अय्यर (प्रथम विधी वर्ष) आणि निरंजन देशपांडे (द्वितीय विधी वर्ष)

**खालील विद्यार्थ्यांनी मूट कोर्ट, अनौपचारिक, संसदीय मॉडेल आणि वाटाघाटी सत्रात भाग घेतला :**

श्री. तुषार वारंग, श्री शुभम सारंगुळे, कु. रुतिका पेठकर, कु. ज्ञानेश्वरी शिंदे, श्री. अजय चव्हाण, श्री. निशांत जोशी, कु. लावण्य पराशर.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२४**

दि.१३ एप्रिल २०२४ रोजी महाविद्यालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. या निमित्ताने वर्ग खोली क्रमांक ७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सविधानाच्या उद्देशिकेचे सार्वजनिक वाचन करण्यात आले यावेळी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी अणि विद्यार्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यांचे वाचन करण्यात आले

**१००% मतदानाचे आव्हान**

दिनांक १३ एप्रिल रोजी महाविद्यालयामध्ये प्राचार्य श्रीविद्या जयकुमार यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये १००% मतदान करू या अशी शपथ घेतली. सदर कार्यक्रम हा इलेक्ट्रो लिट्रसी क्लब (ELC) यांच्या माध्यमातून घेण्यात आला.




**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती दिन**

दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक डॉ. वा. ना. बेडेकर ह्यांचा विसावा स्मृतिदिन साजरा करण्यात आला ह्या वेळेस डॉ. नीतिन रिंढे मराठी साहित्य विभागप्रमुख चेतना महाविद्यालय मुंबई ह्यांचे 'साहित्य आणि सामाजिक संबंध' ह्या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, सहाय्यक प्राध्यापक श्रीमती कृष्णा कामत आणि श्री. अंबर जोशी हे सदर कार्यक्रमास उपस्थित होते.

### आपत्ती व्यवस्थापन व्यावहारिक प्रशिक्षण

आपत्ती आपल्या नियंत्रणाबाहेर आहेत, परंतु आपण किती तयार आहोत हे आपण नियंत्रित करू शकतो.

त्याच भावनेने १५ एप्रिल २०२४ रोजी आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रात्यक्षिक प्रशिक्षण अतिरिक्त प्रमाणपत्र कार्यक्रमाचा भाग म्हणून व्हीपीएम टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे येथे आयोजित करण्यात आला होता. आपत्ती व्यवस्थापन कायदा. ज्यासाठी आम्हाला आमच्यासोबत दोन अपवादात्मक प्रशिक्षक असण्याचे भाग्य लाभले ते म्हणजे यशवंतराव चव्हाण ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट (यशदा) पुणे, डमिनिस्ट्रेशनचे मास्टर ट्रेनर्स म्हणजे श्री. विवेक नायडू, श्री. लखन गायकवाड आणि श्री. अक्षय पाटील. दुपारी २.३० वाजता अधिवेशनाला सुरुवात झाली. कॉलेजच्या मनु सभागृह (मूट कोर्ट हॉल) मध्ये. सहाय्यक प्राध्यापिका सौ.कृष्णा कामथ केसकर यांनी सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात केली. मास्टर ट्रेनर्सची ओळख करून देत त्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला आणि स्वागतपर भाषण प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले. श्री.विवेक नायडू यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली विद्यार्थ्यांना त्यांची पूर्ण एकाग्रता मिळविण्यासाठी मेंदूच्या टीझर क्रियाकलापांमध्ये गुंतवणे प्रशिक्षण आपल्या दैनंदिन जीवनात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण किती महत्त्वाचे आहे हे श्री. नायडू यांनी आम्हाला सांगितले नैसर्गिक किंवा मानवनिर्मित, कधीही आणि कोणत्याही ठिकाणी आपत्ती येऊ शकते, आणि आपण स्वतःला आणि इतरांना वाचवण्यासाठी सर्व मूलभूत प्रशिक्षणांसह मर्यादित उपलब्ध संसाधनांच्या मदतीने सुसज्ज असले पाहिजे.

जसजसे प्रशिक्षण पुढे जात होते, तसतसे अधिकाधिक वैचित्र्यपूर्ण घटक यामध्ये समाविष्ट केले गेले.

विविध प्रकारचे जीवन वाचवणारे गाठी शिकणे, मूलभूत प्रथमोपचार प्रशिक्षण आणि (CPR), आणि अग्निशामक, इतर प्रशिक्षण देण्यात आले. आमच्या व्हिजिटिंग फॅकल्टीपैकी एक डॉ. महेश बर्वे जे ज्येष्ठ भूलतज्ज्ञ आहेत, त्यांनीही अनेक अभ्यासपूर्ण प्रात्यक्षिके दाखवली सीपीआरशी संबंधित तंत्र. दोन्ही मास्टर ट्रेनर्सनी लाइफ सेव्हिंग तंत्र देखील सामायिक केले साप चावणे, कुत्रा चावणे, मधमाशीचा हल्ला इत्यादी घटना. अगदी झोपण्यापूर्वी गॅस रेग्युलेटर बंद करण्याची गरज वास्तविक जीवनातील आपत्तीजनक घटनांचा वापर करून हायलाइट केले गेले.

प्रशिक्षणाच्या शेवटी, आमच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या बास्केटबॉल कोर्टवर नेण्यात आले, जेथे त्यांना अग्निशामक यंत्र फोडण्याचे आणि आग विझवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. कारण हे वारंवार दिसून येते की, फायर फायटिंग एक्टिंग्विशर्स असूनही आमच्या परिसरात उपलब्ध आहेत, ते कसे उघडायचे हे आम्हाला क्वचितच माहीत आहे. त्यांचा प्रभावीपणे वापर करण्यास आपण शिकले पाहिजे.



### जेसीसीएल महाविद्यालयाद्वारे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

दिनांक २० एप्रिल रोजी जितेंद्र चौहान विधी महाविद्यालयाद्वारे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते . सदर परिषदेस प्रभारी प्राचार्या डॉ.श्रीविद्या जयाकुमार तसेच विजिटिंग प्राध्यापक श्री.यतीन पंडित व द्वितीय वर्ष विद्यार्थी तुषार वारंग यांनी कॉन्फरन्स पेपर्स सादर केला त्याचे विषय पुढील प्रमाणे होते. तसेच त्यांचे पेपर सत्रात सर्वोत्तम ठरले:

National Conference on Law , Innovation and Society.

डॉ.श्रीविद्या जयाकुमार : Insolvency and Bankruptcy Code, 2016 - An Innovative Economic Law for Entrepreneurial Innovation in India

ॲड.यतीन पंडित : Compliance Challenges for Indian Business under Digital Personal Data Protection Act, 2023.

तुषार वारंग : Shaping the Future of Law : AI, Ethics and Policy Perspective. (द्वितीय वर्ष विद्यार्थी)

**पूर्वतयारी परीक्षा**

सहावी सेमिस्टर परीक्षेची पूर्वतयारी परीक्षा ११ एप्रिल आणि १४ एप्रिल रोजी घेण्यात आली.

**पूर्वतयारी परीक्षा**

द्वितीय सेमिस्टर परीक्षेची पूर्वतयारी परीक्षा २९ एप्रिल आणि ३० एप्रिल रोजी घेण्यात आली.

**तोंडी परीक्षा (Viva)**

द्वितीय विधी वर्ष विद्यार्थी ह्यांची ५ एप्रिल आणि १० रोजी एप्रिल तोंडी परीक्षा (Viva) घेण्यांत आल्या.

तृतीय विधी वर्ष विद्यार्थी ह्यांची ८ एप्रिल ते १३ रोजी एप्रिल तोंडी परीक्षा (Viva) घेण्यांत आल्या.

**पुनर्मूल्यांकन निकाल**

सत्र I आणि III चे पुनर्मूल्यांकन निकाल अनुक्रमे १ एप्रिल आणि ८ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आले.

**१६ एप्रिल रोजी तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ**

२०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात तृतीय विधीला असलेले विद्यार्थी, लवकरच त्यांची पदवी पूर्ण करून पुढील व्यावसायिक आयुष्यात पदार्पण करणार आहेत. त्यांचा निरोप समारंभ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जया कुमार यांनी विद्या प्रसारक मंडळ, महाविद्यालय व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.



**पुस्तक दिन**

दिनांक २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्त प्रथम एलएलबी आणि द्वितीय वर्षाच्या एलएलबीच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाला पाच हजार रुपयांची पुस्तके भेट दिली.




• महाविद्यालयाचे सहा. प्राध्यापक श्री. विनोद एच वाघ यांनी UGC - MMTTC डॉ. हरी सिंघ गौर विश्वविद्यालय मध्यप्रदेश यांनी आयोजित केलेल्या दोन आठवड्याच्या (१९ एप्रिल २०२४ ते ३० एप्रिल २०२४) NEP - 2020 Orientation Sensitization Programme यशस्वीरित्या पूर्ण करून "A" ग्रेड मिळवला.



• महाविद्यालयाचे सहा. प्राध्यापक श्री. विनोद. एच. वाघ यांनी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये प्रबंध सादरी करणाचे अध्यक्षपद भूषविले. ही राष्ट्रीय परिषद २६ व २७ एप्रिल रोजी घेण्यात आली.

राष्ट्रीय परिषदेचा विषय : Towards Inclusive Society - Interdisciplinary Perspective on Social Justice.

**नवीन फौजदारी कायद्यावर ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळा**

नव्याने लागू केलेल्या तीन गुन्हेगारी कायद्यांवरील एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन जे.डी.गोएंका विद्यापीठ हरियाना ह्यांच्या द्वारे दिनांक २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते.

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष अधिनियम.

ज्येष्ठ ॲड. विनोद राय व उपमा गौलनव GGSIPH प्राध्यापक ह्यांनी 'डिकॉलोनायझेशन ऑब्जेक्ट आणि नवीन कायद्यांची कारणे' ह्याविषयी थोडक्यात चर्चा केली आणि त्यात झालेले बदलही ह्या विषयालाही थोडक्यात स्पर्श केला. सकाळी १०.०० ते ११.३० आणि ११.४५ ते १.१५ अशी दोन सत्रे होती. दुपारी २ वाजता सत्राचा समारोप झाला. ऑनलाइन प्लॅटफॉर्म झूम वर सदर कार्यशाळा संपन्न झाली.

प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी सदर कार्यशाळेस उपस्थित होत्या.

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे यांनी रविवार २८ एप्रिल २०२४ रोजी श्रीमती स्वाती बेडेकर यांच्या चित्रा काठी चित्रांच्या परिचयासह आणि श्रीमती अपर्णा बेडेकर यांच्या नृत्य सादरीकरणासह चित्र काठी प्रदर्शनाचे आयोजन केले होते. डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार, प्रभारी प्राचार्य उपस्थित होते.



**एप्रिल १९९४ ते एप्रिल २०२४**

श्रीमती रंजन करंदीकर , प्रभारी कार्यालय अधीक्षक यांनी सेवेचे ३० वर्ष कालावधी पूर्ण केला. तसेच अभिनंदन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धा**

विद्यार्थ्यांनी त्यांच्या **PLC Based Jacketed Reactor Control System with IoT** या नावीन्यपूर्ण प्रकल्पासाठी १८/०३/२०२४ रोजी विद्यावर्धिनीच्या भाऊसाहेब वर्तक पॉलिटेक्निक, वसई पालघर मुंबई येथे द्वितीय क्रमांक पटकावला. अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी RBTE, Mumbai Region द्वारा आयोजित हे प्रकल्प प्रदर्शन होते.

**PLC Based Jacketed Reactor Control System with IoT**, श्री. रितेश एम शिर्के, श्री. स्वप्नील के तायवाडे, श्रीमान प्रथमेश व्ही कदम, श्री. दुर्वेश एस ठाकूर यांच्या अंतिम वर्षाच्या इन्स्ट्रुमेंटेशन डिप्लोमा विद्यार्थ्यांनी प्रा. स्मिता डी. खंडागळे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

पारितोषिक वितरण समारंभाला अनेक मान्यवर डॉ. व्ही.एम. मोहितकर (संचालक डीटीई, महाराष्ट्र), डॉ. एम. आर. चितलांगे (सचिव एमएसबीटीई, मुंबई), सौ. शर्वरी ढेपे (सहायक संचालक आरओ-डीटीई, मुंबई), डॉ. एम.आर. चितलांगे (सचिव एमएसबीटीई,

मुंबई), श्री.एन.व्ही. मातोळकर (सहाय्यक सचिव आरबीटीई, मुंबई, श्रीमती के.वाय.काळे (सहायक सचिव एमएसबीटीई, मुंबई), श्री. नागनाथ बी. कव्हाळे (प्राचार्य, भाऊसाहेब वर्तक पॉलिटेक्निक वसई) श्री राजेश सोळंकी (सदस्य MSBTE, मुंबई) उपस्थित होते.

ह्या भव्य कार्यक्रमामध्ये ३० हून अधिक कार्यरत प्रकल्प मॉडेल्सचे प्रदर्शन करण्यात आले होते. कार्यक्रमाला उद्योजक व्यावसायिक, शैक्षणिक तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी आणि समाजातील तांत्रिक आणि गैर-तांत्रिक वर्गातील अभ्यागत होते.

रु.५०,०००/- रोख आणि ट्रॉफी देऊन विजेत्यांना गौरान्वित करण्यात आले. इंस्ट्रुमेंटेशन डिपार्टमेंटच्या विभागप्रमुख, सौ. व्ही. ए. जोशी आणि प्राचार्य डॉ. डी. के नायक ह्यांनी दिलेल्या प्रेरणा आणि सहकार्याबद्दल विद्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले.








## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

२ एप्रिल : डॉ. नीतिन जोशी यांनी लिहिलेला शोधनिबंध, 'जर्नल ऑफ इन्फॉर्मेटिक्स एज्युकेशन अँड रिसर्च' या नियतकालिका मध्ये प्रकाशित झाला.

२ एप्रिल : डॉ. नीतिन जोशी यांनी मुंबई विद्यापीठातील एलआयसी तज्ज्ञ म्हणून राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या पीएचडी केंद्रास भेट दिली.

५ एप्रिल: डॉ. पल्लवी चंदवासकर यांना IIM मुंबई आणि TISS यांच्या सहकार्याने VESIM येथे आयोजित TIES आंतरराष्ट्रीय परिषदेत केलेल्या सादरीकरणा मध्ये सर्वोत्कृष्ट केस स्टडी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

६ एप्रिल : एमएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी; सिद्धी प्रसाद खटावकर, प्रियांका रोहिदास नागरे आणि कल्याणी बावस्कर यांनी एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजद्वारे आयोजित 'विकसित भारत @ 2047 : तरुणांचा आवाज' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेमध्ये भाग घेतला व त्यांनी सादर केलेल्या ''इम्पॅक्ट ऑफ पर्सनल फॅक्टर्स व डिजिटल सोशल एंटरप्रेनिरशिप इंटेन्शन'' या शीर्षकाच्या शोधनिबंधाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

१७ एप्रिल : डॉ. नीतिन जोशी यांना सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे, मुलाखतीसाठी तज्ज्ञ सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२० एप्रिल : डॉ. स्मिता जपे, डॉ. महेश आणि डॉ. दिनेश यांनी लिहिलेला ''एक्सप्लोरिंग डिटर्मिनन्ट्स अफेक्टिंग टेक्नॉलॉजी अडोप्टेशन ऑफ इलेक्ट्रोनिक मेडिकल रेकॉर्ड्स अमंग हेल्थ केअर प्रोफेशनल्स इन मुंबई'' हा शोधनिबंध एबीडीसी अनुक्रमित नियतकालिक, जर्नल ऑफ इन्फॉर्मेटिक्स एज्युकेशन अँड रिसर्चमध्ये प्रकाशित होत आहे.

२३ एप्रिल : सहा. प्रा. प्रथमेश उ. तावडे यांना एस के सोमय्या कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स द्वारे आयोजित 'स्किलोमॅटिक्स' या कार्यक्रमात व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी ''ट्रान्सिशन

ऑफ स्टुडंट्स फ्रॉम कॅम्पस टू कार्पोरेट'' या विषयावर व्याख्यान दिले.







२५ एप्रिल : डॉ. पल्लवी चंदवासकर यांना स्कोपस (SCOPUS) अनुक्रमित नियतकालिक 'एशियन जर्नल ऑफ मॅनेजमेंट केस' द्वारे केस स्टडीसाठी समीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांनी जपानी हॉस्पिटॅलिटी उद्योगावरील केस स्टडीचे समीक्षण सादर केले.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

### ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४

दिनांक १० व ११ जानेवारी २०२४ रोजी अणुविद्युत, उपकरणीय व यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातर्फे 'शोधनिबंध कसा लिहायचा आणि प्रकाशित करायचा' याविषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये डॉ.राजेंद्र कुलकर्णी व श्री. नरेंद्र गोळे यांनी प्रमुख वक्ते म्हणून काम पाहिले. सदर कार्यशाळेमध्ये एकूण ३५ शिक्षकांनी सहभाग नोंदवला.



दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील प्रा. केतन कुंडिया यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता व नोकरीच्या संधी' याविषयी व्हीपीएम तंत्रनिकेतन ठाणे येथे संगणक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील प्रा. ललन कुमार यांनी 'उपकरण अभियांत्रिकी व नोकरीच्या संधी' याविषयी व्हीपीएम तंत्रनिकेतन ठाणे येथे उपकरण अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ३० विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील प्रा.केतन कुंडिया यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता व नोकरीच्या संधी' याविषयी शासकीय तंत्रनिकेतन मालवण येथे संगणक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ६० विद्यार्थी उपस्थित होते.




दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजीमहाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या श्री. राहुल कुंडिया यांनी शासकिय तंत्रनिकेतन, मालवण येथे Emerging Trends in Mechanical Engineering या विषयावर व्याख्यान दिले. एकूण ३५ विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग नोंदवला.

दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या श्री. जितेंद्र आचार्य

ज्ञान हे पैशापेक्षा श्रेष्ठ आहे; कारण पैशाचे रक्षण तुम्हाला करावे लागते; ज्ञान तुमचेच रक्षण करते!

यांनी सह्याद्री तंत्रनिकेतन, सावर्डे येथे Refrigeration या विषयावर व्याख्यान दिले. ७० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग नोंदवला.

दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या श्री. हृषिकेश भावे यांनी शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी येथे Robotics and Manufacturing Industry या विषयावर व्याख्यान दिले. ७० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग नोंदवला.

दिनांक १० व ११ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाने दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत डॉ. राजेंद्र कुलकर्णी आणि श्री. नरेंद्र गोळे यांनी 'How to write and get research paper published' या विषयावर शिक्षकांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या ३० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील प्रा. राधिका कदम यांनी 'पायथन प्रोग्रामिंग' याविषयी राजाराम शिंदे तंत्रनिकेतन पेढांबे येथे संगणक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाने डॉ. चंद्रहास हांडा, नागपूर यांचे Engineering Innovation and Education या विषयावरील व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी महाविद्यालयाच्या ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजीमहाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाने डॉ. चंद्रहास हांडा, नागपूर यांचे The Role of Engineering Faculty in Technology Development या विषयावरील व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या ३० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.



दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील माजी विद्यार्थी श्री. श्रुतीक गिजे (लोको पायलट, मुंबई मेट्रो) यांनी 'उपकरण अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी' या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ११ विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील प्रा. राधिका कदम यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता व नोकरीच्या संधी' याविषयी शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी येथे संगणक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ६६ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या श्री. स्वानंद जोशी यांनी शेठ श्री ओतरमाल शेषमाल परमार डिप्लोमा महाविद्यालय, नागोठणे येथे Emerging Trends in Mechanical Engineering या विषयावर व्याख्यान दिले. एकूण २५ विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग नोंदवला.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागामार्फत सर्व विद्यार्थ्यांसाठी 'नावीन्यपूर्ण सेंद्रिय शेती व व्यवसायातील संधी' यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या

व्याख्यानासाठी गुहागर ऑरग्यानीक प्रोड्यूसर कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मंदार जोशी उपस्थित होते. श्री. मंदार जोशी यांनी सेंद्रिय शेतीतील मूलभूत संकल्पना, सेंद्रिय शेतीचे फायदे, रासायनिक शेतीचे मानवी आरोग्य व पर्यावरणावरील घातक परिणाम, विविध संशोधने, शेती व्यवसायासाठी विविध सरकारी योजना या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या श्री. स्वानंद जोशी यांनी तटकरे तंत्रनिकेतन, कोलाड येथे "Emerging Trends in mechanical engineering" या विषयावर व्याख्यान दिले. एकूण ३० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग नोंदवला.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी उपकरणीय अभियांत्रिकी विभागातील शिक्षिका प्रा. राधिका कदम यांनी 'पायथन प्रोग्रामिंग' याविषयी सह्याद्री तंत्रनिकेतन सावर्डे येथे संगणक व माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ६० विद्यार्थी उपस्थित होते.




दिनांक ४ मार्च २०२४ रोजी श्री.नरेंद्र गोळे व श्री.अशोक कर्नाड (दोन्ही माजी BARC शास्त्रज्ञ) यांनी उपकरणीय व अणुविद्युत अभियांत्रिकी विभागातील शिक्षकांना 'विज्ञान, संशोधन, विविध प्रकल्पां' विषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच उच्च शिक्षणासाठी शिक्षकांना प्रोत्साहित केले. सदर कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्ट्स विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमासाठी एकूण ८ प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



दिनांक ४ व ५ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाला ज्येष्ठ शास्त्रज्ञ समिती अंतर्गत ज्येष्ठ शास्त्रज्ञांनी भेट दिली. श्री. संतोष कारखानीस व श्री. अनिल भटनागर यांची विविध विषयांवरील व्याख्याने यावेळी आयोजित केलेली होती आणि विभागाच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण यावेळी पार पडले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ समिती सदस्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शिक्षकांशीही संवाद साधला.

दिनांक ४ व ५ मार्च २०२४ रोजी श्री. नरेंद्र गोळे व श्री. अशोक कर्नाड (दोन्ही माजी BARC शास्त्रज्ञ) यांनी उपकरणीय व अणुविद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमामध्ये एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दिनांक ६ मार्च २०२४ रोजी, श्री. नरेंद्र गोळे यांनी उपकरणीय व अणुविद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांना 'भारतीय अष्टांगयोग' विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमामध्ये एकूण १५ विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर आणि ज्युनिअर कॉलेज, शिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ज्युनिअर कॉलेज, शिरगाव येथील ११वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख प्रशिक्षक म्हणून महाविद्यालयाचे संभाषण कौशल्य विषयाचे प्राध्यापक डॉ. गणेश दिवे यांनी मार्गदर्शन केले.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.